www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार २२ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### महायुतीला भरघोस यश मिळणे अशक्य," बच्चू कडूंचा घरचा अहेर

● अमरावती, नितीन देवळेकर :

महायुतीचे घटक असूनही लोकसभा निवडणुकीत अमरावती मतदार संघात भाजपच्या विरोधात रणशिंग फुंकणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा महायुतीला घरचा अहेर दिला आहे. महायुतीला आपला मोठ्या मताधिक्याने विजय होऊन भरघोस यश मिळेल, असे वाटत असले तरी सध्या राज्यात तशी काही परिस्थिती नाही. पान २ वर

### भगवती रुग्णालयाचे काम निकृष्ट दर्जाचे, कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी



● विरार, दिगंबर जाधव :

बोरिवली येथील भगवती रुग्णालयाच्या विस्ताराचे काम मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले आहे. मात्र हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून कंत्राटदाराने अनेक ठिकाणी अटी व शर्थींचे उल्लंघन केल्याचे दिसून येत आहे. पान २ वर

# मतदानापासून वंचित नागरिकांची लवकरच उच्च न्यायालयात याचिका

## दक्ष नागरिक निवडणूक आयोगाकडे करणार तक्रार

● ठाणे, यश सावंत :

मागील अनेक वर्षापासून कल्याण-डोंबिवली शहरांमध्ये मतदान करणाऱ्या मतदारांची नावे यावेळच्या लोकसभा निवडणुकीच्यावेळी मतदार यादीतून गायब झाली होती. अशाप्रकारे यादीतून नावे गायब झालेली सुमारे एक लाख नावे असण्याची शक्यता राजकीय पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या दुर्लक्षामुळे अनेक मतदारांना आपल्या हक्काच्या मतदानापासून वंचित रहावे लागले. निवडणूक आयोगाच्या या कार्यपध्दतीच्या विरोधात डोंबिवलीतील व्यावसायिक संदेश प्रभुदेसाई हे ॲड. मंगेश कुसुरकर यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल करणार आहेत.



मागील तीस वर्षापासून आपण डोंबिवलीत सागाव येथील मतदान केंद्रावर लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकांमध्ये वेळोवेळी मतदान केले आहे. यावेळी आपण मतदान केंद्रावर गेल्यावर आपल्या कुटुंबीयांचे नाव असल्याचे आणि आपलेच नाव गायब असल्याचे आढळले. मतदार यादीतून नाव गायब असल्याचे कोणतेही सबळ कारण निवडणूक कर्मचारी देऊ शकले नाहीत. निवडणूक आयोगाच्या गलथानपणामुळे आपणास लोकसभा निवडणुकीतील मतदानापासून वंचित रहावे लागले. आपल्यासारखे कल्याण, डोंबिवली परिसरातील सुमारे एक लाख नागरिक मतदानापासून वंचित राहिले असल्याची माहिती आहे. एकीकडे शासन, निवडणूक आयोग मतदानाचा टक्का वाढवा म्हणून प्रयत्न करतो. तर दुसरीकडे लाखो नावे मतदार यादीतून गायब होतात. हे मतदानाचा हक्क असणाऱ्या नागरिकांवर अन्यायकारक आहे. त्यामुळे मतदारांच्यावतीने आपण मुंबई उच्च न्यायालयात दोन दिवसात एक जनहित याचिका निवडणूक आयोगाच्या विरोधात ॲड. कुसुरकर यांच्या मार्फत दाखल करत आहोत, असे प्रभुदेसाई यांनी सांगितले.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील सुमारे एक लाख नावे गायब आहेत याची जाणीव असुनही लोकसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने कोणतीही तत्पर पावले उचलली नाहीत. पान २ वर

### निवडणूक आयोगाकडे तक्रार

■ कल्याण, डोंबिवलीतील ज्या नागरिकांची नावे मतदार यादीतून गायब झाली आहेत. ज्यांना लोकसभा निवडणुकीतील मतदानापासून वंचित रहावे लागले. अशा नागरिकांनी दक्ष संघटनेच्या माध्यमातून, सामाजिक कार्यकर्ते अक्षय फाटक यांच्या माध्यमातून निवडणूक आयोगाकडे यासंदर्भात तक्रारी करण्याचा निर्णय घेतला आहे.

# उल्हासनगर महापालिकेची अवैध होर्डिंगवर कारवाई, ४७ होर्डिंगला नोटिस

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

उल्हासनगर, रोहित जैसवाल : महापालिकेने मुंबई सारखी दुर्घटना टाळण्यासाठी अवैध ४७ जाहिरात होर्डिंगला नोटिसा देत सहायक आयुक्त गणेश शिंपी यांच्या पथकाने मंगळवारी कारवाई सुरू केली. या कारवाईने, अवैध होर्डिंगधारकांचे धाबे दणाणले आहे.

उल्हासनगर महापालिकेने पवन, पंचशील, विंटेज, किंग, मारुती व इतर अश्या ६ ठेकेदारांना एकून ६७ होर्डिंगला परवानगी दिल्या आहेत. त्यांनी होर्डिंगचे स्ट्रॅक्टरल ऑडिट केले. असे महापालिकेच्या वतीने सांगण्यात येते. मुंबईमध्ये जाहिरात फलक पडून १८ पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला असून तशी घटना टाळण्यासाठी महापालिकेने, एकून ४७ अवैध हिर्डिंगला नोटीसा दिल्या



होत्या. नोटीसी नंतरही होर्डिंग काढले नसल्याने, महापालिका अतिक्रमण पथकाने अवैध होर्डिंगवर मंगळवार पासून कारवाई सुरू केली. वर्षानुवर्षे उभ्या राहिलेल्या हिर्डिंगवर महापालिकेने कारवाई का केली नाही? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

अवैध होर्डिंग उभ्या करून लाखो रुपयांचे उत्पन्न घशात घालणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणीही होत आहे.

पान २ वर

# महापालिकेचे नालेसफाईचे आकडे खोटे, नालेसफाईच्या कामाबाबत श्वेतपत्रिका काढा; आशिष शेलार यांची मागणी

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई महापालिकेने पावसाळ्यापूर्वी नाल्यांतून ७५ टक्के गाळ काढल्याचा दावा केला असून हे नालेसफाई कामांबाबत केलेले दावे खोटे आहेत असल्याचा आरोप मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी केला आहे. या नालेसफाई कामांबाबत आपण असमाधानी आहोत, त्यामुळे मुंबई महापालिकेच्या आयुक्तानी नाल्यावर येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी असे आवाहनही त्यांनी केले आहे. तसेच नालेसफाईच्या कामाबाबत मुंबई महापालिका आयुक्तांनी श्वेतपत्रिका काढावी अशीही मागणी त्यांनी यावेळी केली. लोकसभेच्या निवडणूकीसाठीचे मतदान संपल्यानंतर आता पावसाळापूर्व कामांची चर्चा सुरू झाली आहे. मुंबई भाजप अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार यांनी पश्चिम उपनगरातील गझधर बांध जंक्शन,




साऊथ ॲव्हेन्यू, नॉर्थ ॲव्हेन्यू, एसएनडीटी नाला येथील नालेसफाई कामाची पाहणी केली. अद्याप समाधानकारक कामे झालेली नाहीत, असे मत व्यक्त केले. यावेळी आशिष शेलार म्हणाले की, मुंबई शहरात मोठे छोटे अरुंद असे नाले दोन हजार किलोमीटर पर्यंतचे आहेत. नालेसफाईसाठी गेल्यावर्षीच्या अनुभवाच्या आधारे अडीशे कोटींच्यावर खर्च होतो पण परिस्थिती मुंबईकरांना काय दिसते? अडीशे कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होऊन २ हजार किलोमीटरच्या नाल्यांची सफाई समाधानकारक नसते, असाही आरोप शेलार यांनी यावेळी केला. ज्या पद्धतीचा कामाचा वेग आहे तो पाहता पावसाळापूर्वी संपूर्ण नालेसफाई होईल हे अशक्यप्राय वाटत आहे. महापालिका आयुक्त आपण नाल्यावर या, नालेसफाईच्या कामाच्या भेटीचे चित्र दिसू द्या, अजूनही वेळ गेलेली नाही. नाल्यांची ७५ टक्के सफाई झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र चाळीस-पंचेचाळीस टक्क्यांच्यावर नालेसफाई झाल्याचे दिसत नाही, असाही आरोप शेलार यांनी केला आहे.

महापालिकेने २ लाख ७३ हजार मॅट्रिक टन गाळ काढल्याचे म्हटले आहे. हा गाळ कुठे टाकला, व्हिडिओ दाखवा? क्षेपणभूमी कुठे आहे? सर्टिफिकेट दाखवा, जिथून गाळ काढला त्या भागातल्या आजूबाजूच्या प्रत्यक्षदर्शींची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घेतली का? कंत्राटदारांनी दिलेला आकडा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मांडला, अशीही टीका त्यांनी केली.

# मराठी भाषा विभागासाठी दीडशे कोटींची तरतूद गरजेची

## भाषा सल्लागार समितीची राज्य शासनाकडे मागणी




● पुणे, अभिजित येरल्लू :

मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मराठी भाषा विभागास किमान दीडशे कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी. उच्च शिक्षण मराठीतून देण्याच्या निर्णयाची कार्यवाही करण्यासाठी पाठ्यपुस्तके आणि पूरक ग्रंथांची निर्मिती करण्यासाठी मराठी ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी भाषा सल्लागार समितीने राज्य शासनाकडे केली आहे. भाषा सल्लागार समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये उच्च शिक्षण मराठीतून देण्याच्या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल या संदर्भातील कृती आराखडा निश्चित करण्यात आला. त्यामध्ये ही मागणी करण्यात आली असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी दिली.

देशमुख म्हणाले, की इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्यात आला आहे. मराठी विषय अकरावी-बारावीलाही सक्तीचा करण्याचे मान्य झाले आहे. त्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव असून, ती दुरुस्ती झाल्यानंतर पुढल्या वर्षीपासून हा कायदा लागू होईल. पान २ वर

# पावसाने कोल्हापूरला पुन्हा धुतले; शाहूवाडी, पन्हाळा तालुक्यात घरांचे पत्रे उडाले , धान्य भिजले



● कोल्हापूर, सचिन कदम :

सलग दुसऱ्या दिवशी कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. शाहूवाडी, पन्हाळा तालुक्याला पावसाने झोडपून काढले. वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांचे पत्रे उडून दूरवर जाऊन पडले. घरातील धान्य मोठ्या प्रमाणामध्ये भिजले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आजही पावसाने हजेरी लावली. शाहूवाडी. पन्हाळा तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. तत्पूर्वी, दुपारी वादळी वारे घोंगावू लागले होते. जोरदार वाऱ्यामुळे अनेक घरांवरील पत्रे अँगल्ससह उडून पडले.

पान २ वर

# "जर मोदींना स्पष्ट बहुमत मिळालं नाही, तर ते...", शरद पवारांचं मोठं विधान

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी नुकतंच मतदान पार पडलं. या टप्प्यासह महाराष्ट्रातील सर्व टप्प्यांचं मतदान पूर्ण झालं आहे. यंदाच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील मतांची टक्केवारी कमी राहिल्याचं दिसून आलं आहे. त्यासंदर्भात राजकीय विश्लेषक अंदाज व्यक्त करत असताना दुसरीकडे देशपातळीवर अजून दोन टप्प्यांचं मतदान शिल्लक आहे. १ जून रोजी एग्झिट पोल आणि ४ जून रोजी संध्याकाळी अंतिम निकाल हाती येईल. या निकालांबाबत वेगवेगळी भाकितं वर्तवली जात असली, तरी शरद पवारांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबत मोठं विधान केलं आहे.

आत्तापर्यंत झालेल्या पाच टप्प्यांमध्ये जवळपास ४३० मतदारसंघांमध्ये मतदान पार पडलं आहे. उरलेल्या जागांवर दोन टप्प्यांमध्ये



मतदान होईल. यावेळी मतदारांचा कौल नेमका कुणाच्या बाजूला झुकेल? याविषयी वेगवेगळे दावे केले जात आहेत. एनडीएकडून यंदा ४०० पार जागा जिंकण्याचा दावा करण्यात आला आहे. त्यातल्या ३७० जागा या भारतीय जनता पक्ष एकट्याने जिंकून आणेल, असा दृढ विश्वास पक्षाच्या नेतेमंडळींकडून करण्यात येत आहे. खुद्द मोदींनीही तसा दावा अनेक प्रचारसभांमधून केला आहे. या पार्श्वभूमीवर ४ जूनला देशाच्या निवडणूक निकालांचं नेमकं कसं चित्र समोर येणार आहे? याविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

# बारावी परीक्षेचा निकाल 93.37 टक्के; मुलींनीच बाजी मारली - कोकण विभाग अव्वल

● मुंबई, विशाल पाटील :

मंगळवारी महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) बारावीचा निकाल जाहीर केला. यंदा बारावी परीक्षेचा निकाल 93.37 टक्के निकाल लागला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत 2 टक्के हे प्रमाण अधिक आहे. यावर्षीदेखील कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७.५१ टक्के, तर मुंबई विभागाचा निकाल ९१.९५ टक्के लागला. गतवेळेप्रमाणे परीक्षेच्या निकालातही मुलींनी बाजी मारली. मुलींचा निकाल ९५.४९ टक्के, तर मुलांचा ९२.६० टक्के लागला. छत्रपती संभाजी नगर येथील तनिषा सागर बोरामणीकर या विद्यार्थिनीला इतर मार्क जोडून एकूण 100 टक्के गुण मिळाले आहेत. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह बोरामणीकर या विद्यार्थीनीचे विशेष अभिनंदन केले आहे .

राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मंगळवारी दुपारी एक वाजता निकाल जाहीर करण्यात आला. यंदा 12वीची परीक्षा 21 फेब्रुवारी ते 23 मार्च दरम्यान झाली होती. परीक्षेसाठी 15 लाख 13 हजार 909 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी 14 लाख 23 हजार 970 विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी 13 लाख 29 हजार 684 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्य मंडळाच्या मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या 9 विभागीय विभागातील 3 हजार 320 केंद्रांवर ही परीक्षा झाली. छत्रपती संभाजी नगर येथील तनिषा सागर बोरामणीकर या विद्यार्थिनीला 100 टक्के गुण मिळाले आहेत.



100 टक्के गुण मिळवणारी ती महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थिनी आहे. विद्यार्थिनीला थेट परीक्षेत 582 आणि खेळात 18 गुण मिळाले, अशा प्रकारे तिला एकूण 600 गुणांपैकी 600 गुण मिळाले.

### विभागनिहाय परीक्षेचा निकाल

- ■ कोकण : 97.51 टक्के
- ■ पुणे : ९४.४४ टक्के
- ■ नागपूर : ९२.१२ टक्के
- ■ छत्रपती संभाजी नगर : ९४.०८ टक्के
- ■ मुंबई : ९१.९५ टक्के
- ■ कोल्हापूर : ९४.२४ टक्के
- ■ अमरावती : ९३ टक्के
- ■ नाशिक : ९४.७० टक्के
- ■ लातूर : ९२.३६ टक्के

### 10वीचा निकाल 27 मे रोजी

■ केसरकर म्हणाले की, राज्य बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे रोजी जाहीर होण्याची शक्यता आहे. साधारणपणे, 10वीच्या परीक्षेचा निकाल 12वीच्या निकालाच्या दोन किंवा तीन आठवड्यांनंतर जाहीर केला जातो. आठवडाभर आधी निकाल जाहीर करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे केसरकर म्हणाले.

### अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी निराश होऊ नये - केसरकर

■ शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, नापास झालेल्यांनी निराश होण्याची गरज नाही. जुलै महिन्यात दुसरी परीक्षा घेतली जाईल आणि ऑगस्टमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी निकाल जाहीर केला जाईल,तेव्हा या विद्यार्थांनादेखील प्रवेश मिळू शकतो त्यामुळे निरास होऊ नका असे आवाहन केसरकर यांनी केले आहे .

## संपादकीय

# सोन्यातील गुंतवणूक फायद्याची ?

प्रगतशील, सुधारणावादी, विचारी आणि सर्वसमावेशक अशा सरकारला पुन्हा सत्तेवर आणायचे की 1992 पूर्वीच्या अराजकतेच्या अवस्थेला स्वीकारायचे, असे दोनच पर्याय देशापुढे आहेत. कोणताही गुंतवणूकदार दुसर्या पर्यायाला नापसंत करेल, असे उद्गार देशाचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी काढले आहेत.

नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या (एनएसई) मुंबईतील मुख्य इमारतीत ॲन्मी या शेअर दलालांच्या संघटनेने आयोजित केलेल्या भांडवली बाजाराबाबतच्या परिसंवादात भाषण करताना त्यांनी हे विचार मांडले. मात्र, दोन वर्षांपूर्वी एनएसईच्या माजी मुख्याधिकारी चित्रा रामकृष्ण यांना 'धांदली' केल्याबद्दल अटक करावी लागली होती, याचे विस्मरण जयशंकर यांना झाले असावे. त्याचप्रमाणे 'पेटीएम'सारख्या कंपनीबाबत काही आक्षेपार्ह घटना घडल्या होत्या. शेअर बाजारावर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज 'सेबी'ला वाटण्याचे अनेक प्रसंग घडले आहेत. त्यामुळे केवळ 1992 नंतरच नव्हे, तर 2014 नंतरही गुंतवणुकीची बाजारपेठ बर्याचदा संकटात सापडली होती, हे विसरता कामा नये.

सार्वत्रिक निवडणुकांनंतर स्थिर आणि समर्थ सरकार येईल का, यावर शेअर बाजारात तेजी की मंदी, हे अवलंबून असेल. परंतु केवळ शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि जमिनी-फ्लॅट्स, एवढेच नव्हे, तर सोन्यातही लक्षणीय प्रमाणात गुंतवणूक केली जाते. जगभर लोक सोन्यात गुंतवणूक करतात आणि भारतात नागरिकांचे सोन्यामध्ये भावनिक गुंतवणूकही असते. मुलामुलींच्या लग्नासाठी लोक सोने खरेदी करून ठेवतात. ऐपत नसतानाही प्रथा म्हणून सोने घेतात. तसेच संकटाच्या वेळी उपयोगी पडेल, म्हणूनही सोन्याची खरेदी केली जाते. गेल्या अडीच वर्षांत सोन्याच्या गुंतवणुकीवर 50 टक्के 'कंपाउंड ॲन्युअल ग्रोथ रेट' मिळाला, अशी माहिती ॲक्सिस सिक्युरिटीजच्या वस्तू बाजार विभागाच्या तज्ज्ञांनी दिली आहे.

यावेळी अक्षय्यतृतीयेच्या दिवशी भारतात सोन्याची तुफान खरेदी झाली. दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, त्याचप्रमाणे विवाहसोहळ्यानिमित्त मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी केली जाते. गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंडातही लक्षणीय प्रमाणात पैसे टाकले जातात. सध्या युक्रेन, गाझापट्टी अशा विविध ठिकाणी युद्धे सुरू असल्यामुळे बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे जगातील मध्यवर्ती बँका आपले सुवर्णसाठे वाढवत आहेत. त्याचप्रमाणे सोन्याचे भाव 10 ग्रॅमला 70 हजार रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. मार्चमध्ये तर ते भाव 73 हजार रुपयांवर गेले होते. शेअर्स व कर्जरोख्यांप्रमाणेच एकदा बाजाराने शिखर गाठले, की सुवर्ण बाजारातही तांत्रिक घसरण होऊ शकते. तशी ती एप्रिलमध्ये झालीही. 2014 मध्ये 24 कॅरेटच्या 10 ग्रॅम सोन्याची किंमत सुमारे 30 हजार रुपये होती.

ती 2015 मध्ये 27 हजार रुपयांवर आली आणि नंतर मात्र 2017चा अपवाद वगळता, सातत्याने वाढत वाढत आजच्या पातळीवर आली आहे. विशेष करून, 2020 मध्ये एकाच वर्षात सोन्याचे भाव 31 हजारवरून 46 हजार रुपयांवर गेले. तर 2023 मध्ये अंदाजे 59 हजार रुपये असणारा भाव 2024 मध्ये 70 ते 73 हजार रुपयांच्या आसपास गेला आहे. मात्र गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सोन्यावरील परतावा कमी होईल. याचे कारण, 2024च्या उत्तरार्धात अमेरिकेतील व्याजदर घटतील आणि नंतर डॉलर वधारेल.

या सर्व पार्श्वभूमीवर, सोन्याच्या भाववाढीचा वेग मंदावेल, अशी शक्यता संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

सध्या जगातील वेगवेगळ्या देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करत सुटल्या असल्या, तरी आगामी दोन तिमाहींच्या दरम्यान या खरेदीचा वेग घटेल, असा अंदाज आहे. सोन्यात निधी गुंतवल्यास, सुरक्षितता आणि वयपैकी फायदा या दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात. मागच्या पाच वर्षांत भारतातील सोन्याचे भाव दुपटीपेक्षा जास्त गतीने वाढले आणि 2003च्या तुलनेत ते दहापट अधिक आहेत. ज्या ज्या वेळी सोन्याच्या भावात घसरण होते, त्या त्या वेळी ती संधी समजून त्यात गुंतवणूक करता येऊ शकते. अर्थात, सोने टप्प्याटप्प्याने आणि कमी मात्रेत खरेदी करणे इष्ट असते. शिवाय आपली गुंतवणुकीची अल्पकालीन तसेच मध्यम व दीर्घ कालावधीची उद्दिष्टे काय आहेत, याचाही विचार करावा लागतो.

जेव्हा व्यक्तिगत वा गटकर्जे (अनसिक्युअर्ड लोन्स किंवा असुरक्षित कर्जे) ही उपलब्ध होत नाहीत, तेव्हा गोल्ड लोन्सची मागणी वाढते. जेव्हा बाजारात खूप अनिश्चितता असते, तेव्हा असुरक्षित कर्जे मिळत नाहीत.



## आजची चित्रोळी

पंखास पसरुनी फिरत राही आकाशी
तीक्ष्ण नजर पण शोधित जाई खाशी
अढळतां वरुनी जीव खालीं फिरतांना
ती झेपाऊनियां सहज पकडतें त्यांना

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### मतदानापासून वंचित नागरिकांची लवकरच...

हे सर्व विषय आपण उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेच्या माध्यमातून निदर्शनास आणणार आहोत, असे संदेश प्रभुदेसाई यांनी सांगितले. काही नागरिक विदेशातून कल्याण, डोंबिवलीत मतदानासाठी आले होते. त्यामधील काहींची नावे मतदार यादीत नव्हती. हे त्या नागरिकांवर अन्यायकारक आहे, असे ते म्हणाले. मतदार यादीत नावे नसलेल्या अनेक नागरिकांनी सोमवारी निवडणूक अधिकाऱ्यांसमोर घोषणाबाजी करून निषेध व्यक्त केला.

### महायुतीला भरघोस यश मिळणे अशक्य...

लोकांच्या मनात काही प्रमाणात जी नाराजी आहे, ती उघडपणे दिसून आली आहे. ही निवडणूक दोन्ही पक्षांनी जाती आणि धार्मिकतेच्या आधारावर लढवलेली आहे. त्यामुळे ही निवडणूक मुद्द्यांपासून दूर राहिली असल्याचे कडू म्हणाले. तसेच नेमका निकाल कोणत्या बाजूने लागेल हे सध्या तरी सांगता येत नाही, मतदार सुज्ञ आहेत, ते ठरवतील, असेही त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

कडूंनी अमरावती मतदारसंघ वगळता इतरत्र महायुतीला जाहीर पाठिंबा दिला आहे. मात्र, असे असतानादेखील कडूंनी महायुतीवर टीकेची झोड उठवण्याची कुठलीही संधी सोडलेली नाही. अमरावतीत प्रहार जनशक्ती पक्षाने महायुतीच्या विरोधात निवडणूक लढवली. ही निवडणूक महायुतीसाठी सोपी नव्हती, असे त्यांचे म्हणणे आहे. येत्या ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीत कोणाला यश मिळेल, असे कडू यांना विचारले असता ते म्हणाले की, महायुतीला भरघोस यश मिळणार नाही.

### भगवती रुग्णालयाचे काम निकृष्ट दर्जाचे...

त्यामुळे कंत्राटदारावर योग्य कारवाई करून तो दोषी आढळल्यास त्याला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात येत आहे.

मुंबईतील महानगरपालिका रुग्णालयांतील रुग्णांचा वाढता ओघ व रुग्णांना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपनगरीय रुग्णालयांचा विस्तार करण्याचे काम मुंबई महानगरपालिकेकडून हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार बोरिवली पश्चिमेकडील श्री. हरिलाल भगवती (एन.सी.टी.) महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाचा विस्तारही करण्यात येत आहे. इमारतीच्या जागेत मोठी इमारत बांधून गरीब व गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याचे कार्य महानगरपालिकेने केले आहे. परंतु, या इमारतीच्या कामासाठी नेमण्यात आलेला कंत्राटदार कंत्राटातील अटी व शर्तीचे उल्लंघन करुन आपली मनमानी करीत आहे. तसेच अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम केल्याच्या तक्रारी येऊनही महानगरपालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करून संबंधित कंत्राटदारांना पाठीशी घालत आहेत, असे आरोप करण्यात येत आहेत.

कंत्राटदाराने अशाप्रकारे काम करणे हा तमाम मुंबईकरांचा अपमान आहे, असे माझे मत आहे. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने यात लक्ष घालून भगवती रुग्णालयाच्या कंत्राटदाराची चौकशी करावी. तसेच त्यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास त्याला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती मुंबई महानगरपालिकेच माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी अतिरिक्त महानगरपालिका आयक्त डॉ. सुधाकर शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

### मराठी भाषा विभागासाठी दीडशे कोटींची...

उच्च शिक्षण मराठीतून देण्याचा निर्णय झाला आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी जे विषय इंग्रजीतून शिकविले जातात, त्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके आणि पूरक संदर्भ ग्रंथांची निर्मिती करून छपाई करण्याच्या कामासाठी मराठी ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी केली आहे. यंदा पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमाची तयारी केली, तर पुढच्या वर्षी मराठीतून पाठ्यपुस्तके मिळू शकतील, असा कृती आराखडा शासनाला सादर करण्यात आला आहे.

भाषा धोरणाचा मसुदा राज्य शासनाने संमत केला आहे. या मंजूर धोरणामध्ये समाविष्ट न झालेल्या शिफारशींपैकी महत्त्वाच्या शिफारशींसंदर्भात शासनाने पुनर्विचार करून त्यांचा धोरणामध्ये अंतर्भाव करावा, यासाठी समिती आग्रही आहे. मराठी भाषा प्राधिकरण कायदा करावा, असे धोरणामध्ये समाविष्ट केले आहे. त्याचाही पाठपुरावा करण्यात येणार आहे. बँकांनी चेकबुक मराठीमध्ये करावे ही समितीची आग्रहाची मागणी असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

### पावसाने कोल्हापूरला पुन्हा धुतले; ...

काही ठिकाणी ते १०० ते२०० फूट अंतरावर जाऊन पडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

घुंगुर (तालुका शाहूवडी) येथील दाजी पाटील यांच्या घराचे पत्रे वाऱ्यामुळे उडून गेले. ते सुमारे २०० फुटावर जाऊन पडले. छत उडाल्याने घर उजाड झाले. पाठोपाठ आलेल्या मुसळधार पावसामुळे ५० पोती भातासह धान्य भिजले. दोन्ही तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांना पावसाचा फटका सहन करावा लागला. फोटो – १. दाजी पाटील यांच्या घराचे पत्रे दूरवर जाऊन पडले. २. छत उडाल्याने त्याचे घर असे उजाड झाले. ३. पन्हाळा पूर्व भागातील घरांना असा फटका बसला.

### उल्हासनगर महापालिकेची अवैध होर्डिंगवर...

महापालिका अतिक्रमण पथकाचे प्रमुख गणेश शिंपी यांच्या टीमने कल्याण ते अंबरनाथ मुख्य रस्त्यावरील वेलकम गेट जवळ, शांतीनगर येथील विनापरवानगी लावण्यात आले अनधिकृत होर्डींग कापून हटविण्यात आले आहे. महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी अवैध होर्डिंगवर कारवाईचे आदेश दिले असून एकून होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. अवैध होर्डिंग लावून लाखो रुपये उत्पन्न कामविणार्या ठेकेदारावर गुन्हे दाखल करून दंड ठोठाविण्याची मागणी होत आहे. तसेच अवैध होर्डिंग जमीनदोस्त करण्याचा इशारा अतिक्रमण विभागाचे प्रमुख गणेश शिंपी यांनी दिला आहे.

# मतदार यादीतून नावे गायब झालेल्यांना मतदानाची संधी द्यावी !

लोकसभेच्या रिंगणातील पाचव्या टप्प्याची निवडणूक नुकतीच पार पडली. ही निवडणूक खऱ्या अर्थाने गाजली ती मतदारांच्या गायब झालेल्या नावामुळे. मतदार याद्यांमधून मतदारांची नावे गायब होणे हे दर निवडणुकीस स्वाभाविक असले, तरी यंदा हे प्रमाण कित्येक पटीने अधिक होते. उन्हामुळे सर्वत्रचे वातावरण तापलेले असताना वारंवार यादी पडताळूनही आपले नाव सापडत नसल्याचे पाहून बहुतांश मतदारांचा पारा कमालीचा चढला होता. मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य समजून प्रत्येक निवडणुकीला न चुकता मतदान करणाऱ्या अनेक जेष्ठ नागरिकांची नावेही यंदा मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मतदार यादीतून नाव गायब होण्यापासून यंदा सेलिब्रिटी आणि राजकीय मंडळीही सुटली नव्हती. कल्याणमध्ये मतदार यादीमधून नावे गायब झालेल्या मतदारांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले तर अनेक नागरिकांनी आपापल्या परिसरातील राजकीय पुढाऱ्यांकडे तक्रार करण्यासाठी धाव घेतली. 'भारतीय नागरिकत्व दर्शवणारे आधारकार्ड आमच्याकडे आहे, तर केवळ मतदार याद्यांमध्ये नाव नाही म्हणून आम्हाला मतदान करण्यापासून वंचित ठेवू नये. आधार कार्डाच्या आधारावर मतदान करण्यास परवानगी द्यावी' अशीही मागणी याद्यांमध्ये नाव नसलेल्यांकडून केली जात होती. तर यंदा मतदार याद्यांमधून नाव गायब झालेल्यांची संख्या लाखाच्या पटीत असल्याने ४ जूनच्या आधी सर्व मतदार याद्या अद्यावत करून मतदानापासून वंचित राहिलेल्यांसाठी पुनश्च मतदान घेण्यात यावे अशीही मागणी काही नागरिकांकडून केली जात आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक आयोगासह सरकार विविध प्रयत्न करत असते. इथेतर मतदान करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांचीच नावे गायब झाल्याने यंदाच्या मतदानाच्या टक्केवारीवर मोठा परिणाम झाला आहे. देशाला पोलिओमुक्त करण्यासाठी सरकार पोलिओ डोसच्या नियोजित तारखांना जोडून पुढील २-३ दिवस रेल्वे-बस स्टॅन्ड यांसह गर्दीच्या ठिकाणी ५ वर्ष वयाखालील बालकांना डोस देण्यासाठी कर्मचारी नियुक्त करते. एकही मूल पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये हाच यामागील सरकारचा हेतू असतो. मतदारांनाही मतदानापासून वंचित ठेवायचे नसेल, तर यादीतून गायब झालेल्या मतदारांसाठी सरकारला काहीतरी ठोस पावले उचलावीच लागतील !

# मतदारांचा निरुत्साह आणि प्रशासनाचा गोंधळ यंदाही कायम !

लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेतील पाचवा टप्पा नुकताच पार पडला ज्यामध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई या प्रमुख शहरांसह पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या भागातील उमेदवारांचे भवितव्य पेटीबंद(मशिनबंद) झाले आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बराच घाम गाळला. मतदान टक्का वाढवण्यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, देशातील महनीय व्यक्तींच्या फोन कॉलसह बस स्टॅन्ड, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी अनाउन्समेंट करून लोकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले; मात्र दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. मुंबईतील मतदानाचा टक्का पन्नाशीही पार करू शकला नाही. मतदारांतील निरुत्साह यंदा पुन्हा दिसला. असे असले तरी यंदा उत्साही मतदारांची ठिकठिकाणी घोर निराशा झाल्याचे चित्रही अनेक ठिकाणी दिसले. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या ज्या तरुण मतदारांनी यंदा मतदार नोंदणीसाठी अर्ज केले होते त्यापैकी बऱ्याच मतदारांची नावे मतदार याद्यांमध्ये सामाविष्टच करण्यात आली नव्हती, कितीतरी मतदारांची नावे यंदा मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घरे भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले.

घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. ठाणे आणि नालासोपारा या ठिकाणी एक लाखाहून अधिक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून लुप्त झाल्याचे समोर आले आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट झाल्यापासून जे नागरीक प्रत्येक निवडणुकीला नेटाने मतदानाचा अधिकार बजावतात त्यांचीच नावे मतदार याद्यांतून लुप्त झाल्याने यंदा त्यांचा संताप अनावर झाल्याचे चित्र काही ठिकाणी पाहायला मिळाले. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? यासारखे प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाले असून यंदा लाखो मतदारांची नावे मतदार याद्यांमधून लुप्त झाल्याने आणि निवडणुकांचा अंतिम निकाल लागण्यासही बराच कालावधी शेष असल्याने पुढील आठवडाभरात निवडणूक आयोगाने या लुप्त झालेल्या मतदारांची नावे याद्यांमध्ये नव्याने जोडून त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान घेण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे तसेच या गोंधळाला उत्तरदायी असणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणीही केली जात आहे. निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही मतदान केंद्रांवर बोगस मतदान केले जात असल्याचा आरोप करत राजकीय नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याचेही प्रकार घडले. काही ठिकाणी राजकीय समर्थकांवर आणि कार्यकर्त्यांवर आचारसंहिता भंगाचे गुन्हे नोंदवण्यात आले. काही मतदारांची नावे यंदा नेहमीच्या मतदान केंद्रात न येता भलत्याच मतदान केंद्रांना जोडली गेल्याने त्यांना विनाकारण धावपळ करावी लागत होती. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला. उन्हाळ्याचे दिवस आणि त्यात मशीनच्या गोंधळामुळे मतदारांना ३ ते ४ तास रांगेत ताटकळत उभे रहावे लागले ज्यामुळे अनेक मतदार नाराज झाले होते. उन्हाच्या झळा आणि त्यात शासनाचा भोंगळ कारभार यांमुळे शासनाच्या नावे बोटे मोडत अनेकांनी वैतागून मतदान करण्याचे टाळत घरचा रस्ता धरला. अनेक खासगी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे यासाठी कार्यालयात दोन तास उशिरा येण्याची मुभा दिली होती. अशांचे रांगेतच ४ तास वाया गेल्याने त्यापैकी काहींनी मतदान न करताच कामावर जाणे पसंत केले. मतदानासाठी नियुक्त केलेले कर्मचारी पुरेसे प्रशिक्षित नसल्याने मतदान संथगतीने होत असल्याचा आरोपही काही ठिकाणी करण्यात आला, तर काही ठिकाणी विरोधी पक्षाने मुद्दामहून मतदानाची गती संथ केल्याचा आरोप राजकीय पक्षांकडून केला गेला. अवकाळी पावसाच्या भीतीने काही ठिकाणी मतदानासाठी पत्र्याचा शेड्स उभारण्यात आल्या होत्या. उन्हामुळे त्या तापल्याने निवडणूक कर्मचाऱ्यांसह मतदारांचे उकाड्यामुळे हाल होत होते.

अनेक ठिकाणी ऐन दुपारच्या वेळेस वीजपुरवठा खंडित झाल्याने मतदान प्रक्रिया थांबली ज्यामुळे रांगेत उभे असलेल्या मतदारांची घामाने अंघोळ झाली. अनेक मतदान केंद्रावर पिण्याचे गार पाणी, ओआरएस, पंखे, जेष्ठ नागरिकांना आणि रुग्णाईतांना बसण्यासाठी पुरेशा आसंद्या, उन्हापासून रक्षण करण्यासाठी पुरेशा शेड्स, स्वच्छतागृह इत्यादींची योग्य सोय केली गेली नसल्याने मतदारांचे अतोनात हाल झाले. त्यामुळेही काही मतदार मतदान न करता परतले. प्रशासनाच्या असुविधेमुळे ८ मतदारांना रांगेत भोवळ आल्याची नोंद झाली तर दक्षिण मुंबई मतदार संघात एका मतदान केंद्र प्रतिनिधीचा हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली. मतदान केंद्रातील कोंदट वातावरण, मोकळ्या हवेचा अभाव, दुर्गंधी यांमुळे हा मृत्यू झाल्याचा आरोप संबंधित पक्षाने केला आहे. मतदान केंद्रांत मतदान करण्यासाठी जाताना यंदा मोबाईल घेऊन जाण्यास मज्जाव केला जात असल्याने मतदान करून परस्पर कार्यालयात जाणाऱ्यांपुढे मोबाईल ठेवायचा कुठे असा प्रश्न निर्माण होताना दिसला.

देशाचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पाडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायाला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. मतदान प्रक्रिया अधिकाधिक जलद आणि सोपी होण्याच्या दृष्टीने निवडणूक कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले जावे. ईव्हीएम यंत्र बंद पडले तर पर्यायी व्यवस्था प्रत्येक मतदान केंद्रावर असावी. लोकसभा पार पडल्यानंतर विधानसभा निवडणुकांच्या तारखा घोषित केल्या जातील. तेव्हाही असाच गोंधळ कायम राहिला तर अनेक मतदारांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास उडून जाईल जे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक आहे. यंदाच्या लोकसभा निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाण्यात ठेकेदाराची मुजोरी, मतदान यंत्र ठेवलेल्या परिसरात आदेशानंतरही खोदकाम करून विद्युत वाहिनी तोडली

● ठाणे : लोकसभा मतदान पार पडत असल्याने महावितरण कंपनी आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्याचे खोदकाम करू नये असे आदेश दिले होते. असे असतानाही सोमवारी सायंकाळी एका ठेकेदाराने मुजोरी करत चक्क मतदान यंत्रणा ठेवलेल्या जागेत म्हणजेच, दक्षता सुरक्षा कक्ष (स्ट्राँग रुम) असलेल्या भागात रस्ते दुरुस्तीसाठी खोदकाम केले. त्यामुळे या भागातील विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. सुदैवाने स्ट्राँग रुमच्या विद्युत वाहिनी तुटली नाही. अन्यथा येथील यंत्रणा ठप्प झाली असती. हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात खोदकाम करणारी कंपनी लँडमार्क कॉर्पोरेशन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कासारवडवली येथील एका शाळेमध्ये स्ट्राँग रुम स्थापन करण्यात आले आहे. या स्ट्राँग रुममध्ये मतदान यंत्र ठेवले जाते. सीसीटीव्ही कॅमेरे तसेच मोठ्याप्रमाणात यंत्रणा येथे स्थापन करण्यात आली आहे.



पोलिसांही येथे कडेकोट बंदोबस्त असतो. येथील विद्युत पुरवठा खंडीत केला जाऊ नये यासाठी महावितरण कंपनीने ठाणे महापालिका, एमएमआरडीए यासह सर्वच यंत्रणांना घोडबंदर मार्गावरील पातलीपाडा ते कावेसर पर्यंत खोदकाम करू नये अशी सूचना केली होती. घोडबंदर भागात मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि. या कंपनीला ठाणे महापालिकेने रस्ता रुंदीकरणाचा ठेका दिला आहे. या कंपनीलाही खोदकाम करू नये असे आदेश महापालिकेने दिले होते. असे असतानाही कंपनीने स्ट्राँग रुम पासून अवघ्या ३०० मीटर अंतरावर खोदकाम करून विद्युत वाहिनी तोडली. सुदैवाने स्ट्राँग रुमच्या विद्युत वाहिनीला धक्का लागला नसल्याने येथील विद्युत पुरवठा सुरळीत होता. परंतु एक विद्युत वाहिनी तुटल्याने येथील परिसरातील इतर भागाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. त्यामुळे महापालिकेच्या पाणी पुरवठ्यावरही परिणाम झाला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महावितरणने मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि.विरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या ठेकेदाराने यापूर्वी अशाचप्रकारे अनेकदा खोदकाम करून विद्युत वाहिन्या तोडल्या आहेत अशी माहिती महावितरणच्या एका अधिकाऱ्याने दिली.

## थोडक्यात



### पप्पू कालानींनी ११ वर्षांनंतर केले मतदान, जन्मठेपेची झालेली शिक्षा

● उल्हासनगर : जन्मठेपेच्या शिक्षेतून बाहेर आलेले माजी आमदार पप्पू कालानी यांनी तब्बल 11 वर्षानंतर कल्याण लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला आहे.

ते उघडपणे प्रचारात उतरल्याने आणि त्यांनी मतदानाची हाक दिल्याने प्रथमच सिंधी मतदार मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी झाल्याचे चित्र उल्हासनगरात दिसून आले आहे.अशी माहिती कालानी कुटुंबियांचे निकटवर्तीय माजी नगरसेवक मनोज लासी यांनी दिली आहे.

कल्याण सत्र न्यायालयाने पप्पू कालानी यांना 3 डिसेंबर 2013 रोजी इंदर बठीजा हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.त्यानंतर त्यांची रवानगी पुण्याच्या येरवडा कारागृहात करण्यात आली होती.

2021 मध्ये पप्पू कालानी यांची पत्नी,माजी आमदार ज्योती कालानी यांचे निधन झाल्यावर पप्पू कलानी यांची पॅरोलवर सुटका करण्यात आली होती.

हा कोविडचा काळ असल्याने 72 वर्षाच्या वरील कैद्यांना कैदेतून मुभा देण्याचा निर्णय शासनाने घेतला.त्याचा फायदा पप्पू कालानी यांना झाला आहे. दरम्यानच्या काळात महापालिका विसर्जित होऊन निवडणूक लागली नाही.त्यामुळे त्यांना मतदानाचा अधिकार बजावता आला नव्हता.

कल्याण लोकसभा निवडणुकीत टीओके प्रमुख ओमी कालानी यांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांना पाठींबा जाहीर करून दोस्ती का गठबंधन तयार केले.एकीकडे भाजपा,शिवसेना,आठवले गट,मनसे,साईपक्ष हे श्रीकांत शिंदे यांचे काम करत असतानाच दुसरीकडे दोस्ती का गठबंधनच्या प्रचाराची धुरा पप्पू कलानी,ओमी कालानी यांनी हाताळताना चौकाचौकात फिरून असंख्य कॉर्नर मिटींगा घेतल्या आणि श्रीकांत शिंदे यांच्या धनुष्यबाण या निशाणीचा प्रचार करून मतदानासाठी बाहेर पडण्याची हाक दिली.त्यामुळे मोठ्या संख्येने सिंधी मतदार मतदान प्रक्रियेत सहभागी झाला होता.

## अमेरिकेवरून आला पण मतदानापासून राहिला वंचित



● कल्याण : आज लोकसभेच्या पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले. निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या मतदार याद्यांच्या घोळामुळे अनेक नागरिकांना मतदानापासून वंचित रहावे लागले. यात अमेरिकेतून अवधूत दातार हा नागरिक दर पाच वर्षांनी मतदान करण्यासाठी येत असतो. मात्र, यावेळी मतदार यादीत नाव नसल्याने त्याला मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

## कपिल पाटील यांचा अरेरावीपणाचा व्हिडिओ व्हायरल

### डोळे फुटलेत का तुझे.. पोलीस अधिका-याला वापरले अर्वाच्य, अपमानास्पद शब्द

● कल्याण : पाचव्या टप्प्यातील निवडणुका पार पडत असताना भिवंडी लोकसभा मतदर संघात येणाऱ्या अंजूर फाटा चौगुले कॉलेज या ठिकाणी भिवंडी लोकसभेचे खासदार तसेच केंद्रीय मंत्री राहिलेले कपिल पाटील यांचा अरेरावीपणा पहायला मिळाला. ते कर्तव्यावर तैनात असलेल्या पोलिस अधिकारी तसेच कर्मचारी यांना एकेरी भाषेत दम देताना दिसून आले. याबाबत त्यांचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे.



मतदान केंद्रावर आपल्या अवती भोवती देखील कार्यकर्त्यांचा गराडा असताना इतर ठिकाणी का गर्दी आहे असा दम देत तेथील आपले कर्तव्य बजावत असलेले पोलिस अधिकारी तसेच कर्मचारी यांना दादागिरीच्या भाषेत दम देत डोळे फुटलेत का तुझे, तिकडे काय xxxx मारतो का असे बेताल वक्तव्य करताना दिसत आहेत. एक जबाबदार लोकप्रतिनिधी राहिलेले मंत्री कपिल पाटील हे जर पोलिसांशी अश्या भाषेत बोलत असतील आणि असे मगरुरीचे वर्तन करत असतील तर सामान्य लोकांशी वागण्याची त्यांची पद्धत कशी असेल अशी चर्चा सामान्य नागरिकांमध्ये रंगली आहे. कपिल पाटील यांच्या अश्या या बेताल वागण्याबद्दल उपस्थित मतदारांनी नाराजी व्यक्त केली.

## हेलपिंग हँड सामाजिक संस्थेतर्फे कसाऱ्यातील गांगडवाडी गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा

### पाण्याच्या टँकरमुळे महिलांना मिळाली सुखाची झोप

● कल्याण : कसारा घाटा जवळील गांगडवाडी हे सुमारे 400 लोकसंख्या असलेले गावं गेले 10 दिवसांपासून पाणी टंचाईच्या समस्येने त्रस्त झाले होते. नागरिकांच्या या समस्येबाबत माहिती मिळताच कल्याण मधील हेलपिंग हँड सामाजिक संस्थेने नागरिकांच्या मदतीने इगतपुरी येथून टँकर च्या सहाय्याने पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले. येथील नागरिकांना भेडसावणारी पाणी समस्या दूर करण्यासाठी शक्य होईल ती मदत देण्याचे आवाहन सचिन राउत यांनी केले आहे.

सध्या उन्हाचा तडाखा वाढला



असून वाढत्या तापमानाचा फटका सर्वांनाच बसत आहे. अशातच हेलपिंग हँड सामाजिक संस्थेकडे भिवंडी लोकसभा मतदर संघातील कसारा येथील गांगडवाडी गाव पाण्यावाचून व्याकुळ असल्याचा व्हिडिओ आला. महिला विहिरीवर संध्याकाळी 4 वाजता पाण्यासाठी नंबर लावतात शेवटचा नंबर पहाटे 4 वाजता लागतो आणि विहिरीत पाणी फक्त एक वेळेला एक डब्बा शिल्लक.

एक किलोमीटर गावापासून लांब दगडातून हांडे घेऊन महिला जीवघेणा प्रवास करत आहे. तेव्हा काल रात्री हेलपिंग हँड सामाजिक संस्थेने जमा झालेली मदत घेवून टँकर मागवून रात्री 12.30 वाजता महिलांना पाणी पुरवले. आणि संस्थेचे कार्यकर्ते कल्याण मध्ये पुन्हा पहाटे 4 वाजता पोहोचले. परंतु काल महिलांना सुखाची झोप मिळाली प्यायला स्वच्छ पाणी मिळालं असल्याचा आनंद सचिन राऊत यांनी व्यक्त केला आहे.

## डोंबिवलीतील कोपरमध्ये उद्यानाच्या आरक्षित भूखंडावर बेकायदा इमारत

● डोंबिवली – डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागात बेसुमार बेकायदा इमारतींची कामे सुरू आहेत. पालिकेचे आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा हडप करून या बेकायदा इमारती भूमाफियांकडून उभारल्या जात आहेत. कोपरमधील सखाराम नगर गृहसंकुलाच्या बाजुला उद्यानाच्या आरक्षणावर भूमाफियांनी एक सात माळ्याची बेकायदा इमारत उभारली आहे.



या इमारतीला तात्काळ रंगरंगोटी करून या इमारतीवरून कल्याण डोंबिवली पालिकेच्या ह प्रभागाकडून कारवाई होऊ नये अशी व्यवस्था येथे करण्यात आली आहे. पालिकेच्या नगररचना विभागातील एका कर्मचाऱ्याला हाताशी धरून या जागेच्या आरक्षित भौगोलिक क्षेत्रात बदल करून या बेकायदा इमारतीची उभारणी केली असल्याची माहिती या भागातील स्थानिकांनी दिली आहे.

**सखारामनगर गृहसंकुल भागातील पालिकेचे आरक्षित भूखंड हडप करून भूमाफियांनी बेकायदा इमले उभे केले आहेत. यापूर्वी या भागातील काही बेकायदा इमारतींवर कारवाई झाल्या आहेत. डोंबिवलीत सर्वाधिक बेकायदा इमारती उभारणाऱ्या, महारेरा गुन्हे प्रकरणात आरोपी असलेल्या एका भूमाफियाचा या बेकायदा इमारत प्रकरणात सक्रिय सहभाग असल्याचे या भागातील तक्रारदारांनी सांगितले. या इमारतीची तक्रार करणाऱ्या डोंबिवली पूर्वेतील माध्यम क्षेत्रातील आणि एका लोकप्रतिनिधीला या बेकायदा माफियांनी दोन सदनिका निशुल्क दिल्या असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. या बेकायदा इमारतीची पालिकेत नावनिशी तक्रार केली तर कोपर भागात फिरणे मुश्किल होईल या भीतीने या बेकायदा इमारती विषयी उघडपणे बोलण्यास कोणीही तयार नाही. पालिकेतील नगररचना विभागातील एका वाद्ग्रस्त कर्मचाऱ्याने ही बेकायदा इमारत उभारणीसाठी महत्वाची भूमिका बजावली असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या बेकायदा इमारतीमुळे परिसरातील सोसायट्यांमधील रहिवासी त्रस्त आहेत.**

## कल्याण पश्चिमेत एक लाख मतदारांची नावे गायब – शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील

### निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभाराचा नागरिकांना फटका बसल्याचा पाटील यांचा आरोप

● कल्याण : आज पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत अनेकांची नावे मतदार यादीत नसल्याचे दिसून आले. असाच प्रकार कल्याण पश्चिमेत उघडकीस आला असून कल्याण पश्चिम विधानसभा क्षेत्रात तब्बल एक लाख मतदारांची नावे गायब असून निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभाराचा फटका नागरिकांना बसला असल्याचा आरोप शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी केला आहे.

याबाबत शिवसेना कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, आज मतदानाचा हक्क मी आणि माझ्या परिवाराने बजावला आहे. एकंदरीत प्रभागामध्ये फिरत असताना नागरिकांना त्रास झालेला दिसून येत आहे. निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार समोर येत असून प्रत्येक प्रभागात अडीच ते तीन हजार मते गायब असून ज्या लोकांनी मागच्या वेळेस ज्यांनी मतदान केले त्यांची नावे पूर्णपणे गायब आहेत. अतिशय भोंगळ कारभार



निवडणूक अयोगाचा आहे. याला जे जबाबदार आहेत त्याच्यावर निवडणूक आयोगाने तातडीने कारवाई करावी अंदाजे एक लाख नावे गायब असल्याचे अभ्यासावरून दिसून येत असल्याचे पाटील यांनी सांगितले.


तर प्रत्येक वार्डात मतदार आम्हाला बडबडत आहे. माझा मतदानाचा हक्क हिरवून घेतला आहे. हक्काच्या मतदाराचे नाव नसल्याने त्यांचे मत नसते तेव्हा तो नाराज होतो. त्यांच्या कुटुंबातील दोन जणांची नावे आहेत. दोन जणांची नावे नाहीत ही जी परिस्थिती ही गंभीर आहे. निवडणूक आयोगाने तातडीने अँक्शन प्लॅन तयार करून येणाऱ्या निवडणूका लगेच लागतील त्यांच्या साठी डिलिटेड म्हणून शिक्के मारलेले आहेत त्याचे सर्व्हे करून तो माणूस तिथे राहतो. त्याचे नाव तातडीने समाविष्ट झाले पाहिजे हि मागणी आहे.

मतदारांची नावे देखील मतदानासाठी लांबच्या मतदान केंद्रात आलेली आहेत. मोहन्यातील नावे ऊबर्डेल आलेली आहेत. टिटवाळ्यातील नावे डोंबिवलीत गेली आहेत. हा कुठला प्रकार आहे. नावा मध्ये प्रिंटिंग मिसेटेक आहे. डाटा ऑपरेटर बसविलेले शिक्षित होते का? असा सवाल रवी पाटील यांनी उपस्थित केला आहे.

## डोंबिवलीत कोपर येथे नैसर्गिक तलाव रस्त्यासाठी बुजविण्याच्या हालचाली, पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी

● डोंबिवली – कल्याण, डोंबिवली शहरांमधील जुने तलाव, विहिरी विकास कामे, नवीन गृहप्रकल्पांसाठी बुजविण्याचा सपाटा बांधकामधारकांकडून सुरू आहे. आता डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागात अनेक वर्षांचा नैसर्गिक झरे असलेला एका जुना तलाव बुजविण्याच्या जोरदार हालचाली रस्ते बांधकाम ठेकेदाराकडून सुरू आहेत. कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक झरे असलेला कोपर येथील जुना तलाव बुजवू नये म्हणून पर्यावरणप्रेमींनी शासनस्तरावर जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.

कल्याण, डोंबिवली पालिका हद्दीतील शहराच्या मुख्य रस्ते, भागातील सावली देणारी झाडे रस्ता रुंदीकरण, काही गृहप्रकल्प उभारणाऱ्या विकासकांनी पालिकेच्या परवानग्या घेऊन तोडली. या झाडांच्या बदल्यात पालिकेने निश्चित केलेल्या आंबिवली परिसरातील जागेवर या विकासकांनी एका झाडाच्या बदल्यात १० झाडे लावून दिली आहेत. ४० वर्षांपूर्वीच्या अनेक इमारती, घरांच्या परिसरात जुन्या विहिरी होत्या. या विहिरी विकासाच्या नावाखाली विकासकांनी बुजून टाकल्याचे चित्र कल्याण, डोंबिवलीत आहे. नैसर्गिक स्त्रोत बुजवून पर्यावरणाची हानी करण्याचे काम एक यंत्रणा करत असल्याची टीका पर्यावरणप्रेमी करत आहेत.



### कोपर तलाव

**■ कोपर पश्चिमेत खाडी किनारा भागात एक जुना तलाव आहे. याठिकाणी नागरिक गणपती विसर्जनासाठी, मासेमारीसाठी येतात. या तलावात नैसर्गिक झऱ्यांमुळे बारमही पाणी असते.जैवविविधतेला हा तलाव पिण्याच्या पाण्यासाठी मोठा आधार आहे. या तलावाच्या चारही बाजुने खारफुटी, जंगली झाडे आहेत. या तलावाच्या बाजुने माणकोली पुलाकडून येणारा रेतीबंदर रेल्वे फाटकाकडे जाणारा एक रस्ता बांधला जात आहे. एमएमआरडीएने माणकोली पुलाच्या डोंबिवली बाजूकडील उतार रस्त्यावर कल्याण डोंबिवली पालिकेचा वळण रस्ता बाधित केला. त्यामुळे डोंबिवलीत येणाऱ्या वाहनांसाठी एमएमआरडीएला मोठागाव स्मशानभूमी, मल उदंचन केंद्र ते कोपर भागातून एक रस्ता रेतीबंदर रेल्वे फाटकाच्या दिशेने बांधावा लागत आहे. या रस्त्यासाठी कोपर भागातील नैसर्गिक तलाव बाधित होत आहे. त्यामुळे तो बाजुच्या भागात पाण्यासह स्थलांतरित करण्याचे प्रयत्न ठेकेदाराकडून सुरू आहेत. नवीन जागेत चारही बाजुने सिमेंट भिंत बांधून हा तलाव संरक्षित केला जाण्याचा देखावा ठेकेदाराकडून उभारला जात आहे, असे पर्यावरणप्रेमींना सांगितले.**

# 'तुजवीण.. सख्या रे'नंतर गौरव घाटणेकर 'या' नव्या मालिकेत झळकणार प्रमुख भूमिकेत



मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय जोडप्यांपैकी एक म्हणजे अभिनेत्री श्रुती मराठे व अभिनेता गौरव घाटणेकर. दोघं अभिनयाबरोबर निर्मिती क्षेत्रातही काम करत आहेत. 'ब्लॅक कॉफी प्रॉडक्शन्स' असं त्यांच्या निर्मिती संस्थेचं नाव आहे. २०२२मध्ये सुरू झालेल्या 'नवा गडी नवं राज्य' मालिकेद्वारे श्रुती व गौरवने निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवलं. दोघांची पहिली निर्मिती असलेल्या या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर आता श्रुती व गौरवची निर्मिती असलेली नवी मालिका प्रेक्षकांच्या लवकरच भेटीस येत आहे. याच मालिकेत गौरव 'तुजवीण सख्या रे'नंतर प्रमुख भूमिकेत पाहायला मिळणार आहे.

'तुजवीण सख्या रे' मालिकेत गौरव घाटणेकरने साकारलेल्या रिषभने सगळ्यांचं वेड लावलं होतं. तरुणाईमध्ये रिषभ खूप चर्चेत होता. 'तुजवीण सख्या रे' मालिकेनंतर गौरव बऱ्याच मालिकांमध्ये छोट-छोट्या भूमिका करताना दिसला. पण आता नव्या मालिकेत प्रमुख भूमिकेत गौरव झळकणार आहे. श्रुती आणि त्याचीच निर्मिती असलेली 'सोनी मराठी' वाहिनीवरील 'भूमिकन्या – साद घालते निसर्गराजा' या नव्या मालिकेत गौरव दिसणार आहे.

१० जूनपासून 'भूमिकन्या – साद घालते निसर्गराजा' नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. या मालिकेत गौरव हर्षवर्धनची व्यतिरेखा साकारणार आहे. आता हर्षवर्धनची व्यक्तिरेखा कशी असेल? आणि त्याचा परिवेष कसा असेल? याबाबत सगळ्यांनाच उत्सुकता आहे. मालिकेचा विषय फार नवीन आणि वेगळा आहे. आपल्या शेतकरी वडिलांना ही भूमिकन्या कशी साथ देणार, हे या मालिकेतून पाहायला मिळणार आहे. लक्ष्मी असं या भूमिकन्येचं नाव असून अभिनेत्री अनुष्का बोऱ्हाडे ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. अभिनेत्री अनुष्का बोऱ्हाडे हिला प्रेक्षकांनी आजवर विविध व्यक्तिरेखांमधून पाहिले आहे. प्रेक्षकांनी तिच्यावर भरभरून प्रेम देखील केलं आहे. पण आता 'भूमिकन्या – साद घालते निसर्गराजा' या मालिकेत भूमिकन्या म्हणजेच लक्ष्मी या व्यक्तिरेखेद्वारे ती प्रमुख भूमिकेत दिसणार आहे.

आता हर्षवर्धन आणि लक्ष्मी यांची जोडी कशा प्रकारे प्रेक्षकांच्या भेटीस येईल? हे प्रेक्षकांना प्रत्यक्ष मालिकेतूनच पाहायला मिळेल. येत्या १० जूनपासून 'सोनी मराठी' वाहिनीवर सोमवार ते शनिवारी रात्री ८ वाजता 'भूमिकन्या – साद घालते निसर्गराजा' मालिका प्रसारित होणार आहे. दरम्यान, गौरव घाटणेकर याआधी 'स्टार प्रवाह'च्या 'अबोली' मालिकेत पाहायला मिळाला होता. या मालिकेत त्याने वकिलाची भूमिका साकारली होती.

## शिवाली परबनंतर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेत्याने बांधलं हक्काचं घर



प्रत्येकाचं स्वप्न असतं की, आपल्याकडे स्वतःचं हक्काचं घर असावं. त्यामुळे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक जण अविरत मेहनत करत असतात. काही दिवसांपूर्वी हक्काच्या घराचं स्वप्न 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील अभिनेत्री शिवाली परबचं पूर्ण झालं. तिने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर नव्या घरात गृहप्रवेश केला. याचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. त्यानंतर आता 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' मधील अभिनेत्याचं हक्काच्या घराचं स्वप्न साकार झालं आहे. याबाबत त्याने सोशल मीडियावर फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील या अभिनेत्याने गेल्या महिन्यात आलिशान गाडी घेण्याचं स्वप्न पूर्ण केलं होतं. लाल रंगाची महिंद्रा थार खरेदी केली होती. त्यानंतर आता या अभिनेत्याने गावाकडे हक्काचं घर बांधलं आहे. आतापर्यंत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील हा अभिनेता कोण असेल हे लक्षात आलंच असेल. हा अभिनेता दुसरा तिसरा कोणी नसून प्रथमेश शिवलकर आहे. प्रथमेशने आपल्या स्वप्नातली वास्तू बांधली आहे. याचे फोटो त्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

या फोटोंमध्ये प्रथमेशच्या हक्काचं सुंदर शेतकर पाहायला मिळत आहे. 'शिवार्पण' असं त्याच्या स्वप्नातल्या वास्तुचं नावं आहे. फोटो शेअर करत प्रथमेशने लिहिलं आहे, "याचसाठी केला होता अट्टाहास भाग २: 'शिवार्पण'...शहरापासून दूर हक्काची एक वास्तू असावी; जिथे निर्मळ शांतता अनुभवता यावी...मातीच्या सुगंधाने दरवळत रहावा तिथला प्रत्येक क्षण; अशीच स्वप्नातली वास्तू झाली साकार, नाव तिचं 'शिवार्पण'...ज्या वास्तुत आपण लहानाचे मोठे होतो, त्या वास्तुला जेव्हा मोठं करण्याची संधी आपल्याला मिळते...तेव्हा त्या वास्तुचे ऋण फेडण्याचा केलेला छोटा प्रयत्न म्हणजे 'शिवार्पण'...हक्काचं शेतघर...याचसाठी केला होता अट्टाहास सीरिज टू बी कंटिन्यू."

## आरसीबीने पैसा वाया घालवला...', बंगळुरुच्या विजयानंतर यशच्या वडिलांचा टीकाकारांबद्दल खुलासा



यश दयाल, हे तेच नाव आहे ज्याची कारकिर्द रिंकू सिंगने सलग ५ षटकार मारुन जवळपास संपुष्टात आणली होती. या षटकारानंतर केवळ वेगवान गोलंदाजालाच नव्हे, तर कुटुंबीयांनाही टीकेला सामोरे जावे लागले. पण १८ मे रोजी सीएसकेविरुद्धच्या सामन्यात दयाल आरसीबी आणि त्याच्या चाहत्यांसाठी यशस्वी ठरला. त्याने शेवटच्या षटकात धोनीची विकेट घेत १७ धावांचा बचाव करत आरसीबीला प्लेऑफमध्ये पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली. यानंतर त्याच्या कुटुंबीयांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, मागील टोमणे आठवत यशच्या वडिलांनी ट्रोलर्सना चोख प्रत्युत्तर दिले आहे.

इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीदरम्यान यशच्या वडिलांनी सांगितले की, 'सीएसकेविरुद्धच्या सामन्याच्या शेवटच्या षटकात मी टीव्ही चालू करण्यापासून स्वतःला रोखू शकलो नाही. धोनीने पहिल्या चेंडूवर षटकार मारला तेव्हा मी माझ्या मुलाचा आणखी एक सामना उध्वस्त केल्याबद्दल स्वतःला दोष देत होतो. धोनी असा फलंदाज आहे, जो आजही कोणत्याही गोलंदाजाच्या षटकात धावांचा पाऊस पाडू शकतो. त्यामुळे मी हात जोडून देवाला प्रार्थना करू करत होतो. देवा, आजचा दिवस माझ्या मुलाचा खास बनव आणि मागील हंगामाप्रमाणे होऊ देऊ नको. मात्र, पहिल्या चेंडूनंतर त्याने ज्या प्रकारे संयम राखला, त्यामुळे या विजयाचा मी मनापासून आनंद घेतला."

## "मी सिलेक्टर्सच्या पाया पडलो नाही म्हणून माझी संघात निवड केली - गौतम गंभीर

गौतम गंभीर आयपीएल २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्स संघात मेंटॉर म्हणून परतला. मेंटॉर गंभीरच्या मार्गदर्शनाखाली कोलकाताचा संघ यंदाच्या हंगामात प्लेऑफमध्ये पोहोचला आहे. फक्त प्लेऑफमध्येच नाही तर केकेआरचा संघ सर्वाधिक गुणांसह पहिल्या स्थानी आहे. आता या दरम्यानच गौतम गंभीर रवीचंद्रन अश्विनच्या चॅट शो मध्ये पोहोचला होता. या मुलाखतीत गंभीरने अनेक विविध मुद्द्यांवर भाष्य केले आणि त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील एक अशी घटना सांगितली, जी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.



गौतम गंभीरने १४ वर्षांखालील स्पर्धेमध्ये आपल्याशी भेदभाव कसा केला गेला हे उघड केले. गंभीर म्हणाला, 'मी कदाचित १२ किंवा १३ वर्षांचा होतो, जेव्हा मी प्रथमच १४ वर्षांखालील स्पर्धेसाठी खेळण्याचा प्रयत्न केला, तेव्हा निवडकर्त्यांच्या पाया न पडल्याने माझी निवड झाली नाही. तेव्हापासून मी स्वतःला वचन दिले की मी कधीही कोणाच्या पाया पडणार नाही आणि मी कधीही कोणाला माझ्याही पाया पडू देणार नाही.

गौतम गंभीर म्हणाला की, जेव्हा जेव्हा त्याला अपयशाचा सामना करावा लागतो, तेव्हा त्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचाही उल्लेख केला जातो. तो म्हणतो, 'मला आठवते की जेव्हा मी माझ्या कारकिर्दीत अपयशी ठरलो, मग ते अंडर-16, अंडर-19, रणजी ट्रॉफी असो किंवा माझ्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात असो. लोक म्हणायचे की तू श्रीमंत कुटुंबातून आला आहेस, तुला क्रिकेट खेळण्याची गरज नाही. तुमच्याकडे बरेच पर्याय आहेत, तू तुझ्या वडिलांच्या व्यवसायातही जाऊ शकतोस. पण मला लोकांच्या याच विचारसरणीला प्रत्युत्तर द्यायचे होते.

याच शोमध्ये गंभीरने KKR चा सहमालक शाहरुख खानसोबतच्या त्याच्या बॉन्डबद्दलही मोकळेपणाने सांगितले. रविचंद्रन अश्विनच्या यूट्यूब चॅनलवर गंभीर म्हणाला, 'मी हे यापूर्वीही अनेकदा सांगितले आहे, मला वाटते की शाहरुख खान मी आतापर्यंत काम केलेला सर्वोत्तम संघमालक आहे. मी आता केकेआरमध्ये परतलो आहे म्हणून नाही. याचे कारण म्हणजे माझ्या कर्णधारपदाच्या सात वर्षात आम्ही ७० सेकंदही क्रिकेटवर बोललो नाही. आपण कल्पना करू शकता?

गौतम गंभीर कर्णधार असताना त्याने केकेआरसाठी २०१२ आणि २०१४ मध्ये आपल्या नेतृत्वाखाली केकेआरला चॅम्पियन बनवले होते. गौतम गंभीरने केवळ आयपीएलमध्येच नाही तर भारतीय क्रिकेटमध्येही मोठे योगदान दिले आहे. २००७ टी-२० विश्वचषक आणि २०११ एकदिवसीय विश्वचषक भारताला जिंकून देण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९: गोपाल निमाजी वानवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४ )

१९४८ : नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन : १४ जून २०२०)

१९२३ : आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्यअभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९ )

१९०९ : एडविन एच लँड - पोलाराईड कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक (निधन : १ मार्च १९९१)

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरुरकर लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१: प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ॲलन मॅक्लिओड कॉर्मक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)


१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)


१९२४: अलारी सीताराम राजू - भारतीय कार्यकर्ते (जन्म: ४ जुलै १८९७)

## करीना-तब्बू-क्रितीची जुगलबंदी OTT वर पाहता येणार

### या वीकेंडला प्रदर्शित होणाऱ्या कलाकृती कोणत्या? वाचा नावं

प्रेक्षकांमध्ये ओटीटीची क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकांना चित्रपटगृहात बसून चित्रपट पाहण्याचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे ते घरीच ओटीटीवर जगभरातील चित्रपट, वेब सीरिज अन् शो बघणं पसंत करतात. अनेकजण ओटीटी प्लॅटफॉर्मवर दर आठवड्याला प्रदर्शित होणाऱ्या नवीन वेब सीरिज आणि चित्रपटांची आतुरतेने वाट पाहत असतात. दर आठवड्याला ओटीटीवर कोरियन, इंग्रजी, हिंदी, दाक्षिणात्या चित्रपट प्रदर्शित होत असतात. या वीकेंडला तुम्हाला ओटीटीवर नवीन काय पाहता येईल, त्याबद्दल आम्ही सांगणार आहोत.




या आठवड्यात बॉलीवूडचा सुपरहिट चित्रपट ओटीटीवर येतोय. तीन अभिनेत्री मुख्य भूमिकेत असलेला 'क्रू' चित्रपट जर तुम्ही थिएटरमध्ये पाहू शकला नसाल तर आता तो तुम्हाला घरी बसून पाहता येणार आहे. याशिवाय रणदीप हुड्डाचा 'स्वातंत्र्य वीर सावरकर' सिनेमाही ओटीटीवर येतोय. या वीकेंडला कोणते चित्रपट आणि वेब सीरिज कुठे आणि कधी प्रदर्शित होणार आहेत, ते पाहुयात.

'क्रू' हा कॉमेडी चित्रपट आहे. याचं दिग्दर्शन राजेश ए कृष्णन यांनी केलं आहे. या चित्रपटात तब्बू, करीना कपूर खान आणि क्रिती सेनॉन या तिघीही आघाडीच्या अभिनेत्रींनी एअर होस्टेसच्या भूमिका साकारल्या आहेत. तर दिलजीत दोसांझ आणि कपिल शर्मा हे दोघेही महत्त्वाच्या पण पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत आहेत. एकता कपूर, रिया कपूर, अनिल कपूर आणि दिग्विजय पुरोहित यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रिपोर्ट्सनुसार, हा चित्रपट २४ मे रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. ७५ कोटी रुपयांचं बजेट असलेल्या या चित्रपटाने जगभरात १५६.३६ कोटी रुपयांची कमाई केली होती.

'स्वातंत्र्यवीर सावरकर'

'स्वातंत्र्य वीर सावरकर'मध्ये रणदीप हुड्डा मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटातून त्याने दिग्दर्शनातही पदार्पण केलं. स्वातंत्र्य वीर सावरकर चित्रपट हा वीर सावरकर यांच्या जीवनावर आधारित आहे. २० कोटींच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट २२ मार्च २०२४ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. त्यात अंकिता लोखंडे, अमित सियालसह अनेक कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट २८ मे रोजी झी ५ वर पाहता येईल.

'वॉन्टेड मॅन'

चित्रपटाची कथा एका गुप्तहेराभोवती फिरते जो एका महिलेच्या गुन्ह्यामागची गोष्ट काय आहे, याचा शोध घेण्यासाठी मेक्सिकोला जातो. हा चित्रपट २४ मे पासून लायन्सगेट प्लेवर पाहू शकता.

'द कार्दशियन्स'

'द कार्दशियन्स सीझन ५' २३ मे रोजी डिस्ने प्लस हॉटस्टारवर प्रदर्शित होईल.

## राशि भविष्य

**मेष** – समाधानी आयुष्यासाठी आपल्या मनाचा कणखरपणा सुधारा. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. आनंददायक सायंकाळ घालविण्यासाठी मित्राच्या घरी आमंत्रण येऊ शकते. प्रेमात आज तुम्ही तुमच्या अधिकाराचा वापर करा.

**वृषभ** – अन्य लोकांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करीत तुम्ही तो आनंद साजरा कराल. नवीन करार लाभदायक वाटण्याची शक्यता आहे, पण तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होण्याची शक्यता कमी आहे. पैसे गुंतवताना घाईगडबडीने कोणताही निर्णय घेऊ नका. सहकुटूंब सामाजिक कार्य केल्याने प्रत्येकजण आनंद आणि निवांत राहील.

**मिथुन** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आर्थिक रूपात आज तुम्ही बरेच मजबूत असाल ग्रह नक्षत्रांच्या चालीने आज तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल. कंटाळवाण्या आणि धीम्या अशा दिवशी मित्र आणि जीवनसाथी तुम्हाला आराम आणि आनंद मिळवून देतील. प्रेमातील असीम आनंद अनुभवण्यासाठी कोणाचा तरी शोध घ्या.

**कर्क** – प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. ज्या लोकांनी कुठे गुंतवणूक केली होती आजच्या दिवशी तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे. रंजक गोष्टींच्या मागे धावू नका, सत्यस्थितीचा विचार करण्याचा प्रयत्न करा. मित्रांबरोबर अधिक वेळ घालवा, ते तुमच्यासाठी फायद्याचे असेल.

**सिंह** – संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. आज केवळ बसून राहण्यापेक्षा - काहीतरी असे करा ज्यामुळे तुमची मिळकत क्षमता वाढू शकेल. कुटुंबाच्या आघाडीवर काही त्रासदायक प्रश्न निर्माण होतील.

**कन्या** – तुमच्या पुढे जाण्यासाठी कुणीतरी तुमचा मूड बिघडविण्याचा प्रयत्न करेल परंतु तुम्हाला त्रास देण्याचा हा प्रयत्न तुम्ही यशस्वी होऊ देऊ नका. या सगळ्या फुकाच्या चिंता आणि काळज्या यामुळे तुमच्या शरीरावर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि कदाचित त्वचाविषयक समस्या उद्भवेल.

**तूळ** – राग अनावर झाल्याने बाचाबाची आणि संघर्ष होऊ शकतो. आर्थिक रूपात आज तुम्ही बरेच मजबूत असाल ग्रह नक्षत्रांच्या चालीने आज तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा.

**वृश्चिक** – एखादा मित्र किंवा जुजबी ओळख असलेल्या व्यक्तीच्या स्वार्थी वागणुकीमुळे तुमची मन:शांती गमावून बसाल. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टीमध्ये खूप पैसा खर्च करू शकतात परंतु, तरी ही तुमचा आर्थिक पक्ष आज मजबूत राहील. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा - मग त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा वेगळी क्लृप्ती करावी लागली तरी चालेल.

**धनु** – आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे. 'सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी मनातूनच जन्माला येतात त्यामुळे मन हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी ते मदत करेल आणि योग्य तो प्रकाशमार्ग दाखवेल.

**मकर** – आपल्या जीवनसाथीचे आरोग्य हे तणावाचे आणि चिंतेचे कारण ठरू शकेल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल. मुलांनी त्यांच्या अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची आणि भविष्याची योग्य योजना करण्याची गरज आहे. एखाद्या आनंदी प्रसन्न सहलीला जाण्याची शक्यता आहे.

**कुंभ** – अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारिरिक व अध्यात्मिक फायदा होईल. तुम्हाला अफलातून नव्या संकल्पना सुचतील ज्यामुळे आर्थिक फायदा संभवतो. मुलांवर आपली मते लादण्यामुळे ती त्रस्त होतील.

**मीन** – तुमचे हास्य हे नैराश्य घालविण्यासाठीचा उत्तम उपाय ठराल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. पाहुण्यांचा सहवास आनंददायी असणारा दिवस. आपल्या नातेवाईकांसाठी काहीतरी खास योजना आखा, ते नक्कीच तुमचे कौतुक करतील.

# साताऱ्यातील आपत्ती व्यवस्थापन बचाव प्रात्यक्षिका २८ मे रोजी कराड येथे होणार





● सातारा : सातारा जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत युद्ध पातळीवर उपाययोजना राबवण्यात आलेल्या आहेत. त्याचे मॉक ड्रिल म्हणजे प्रात्यक्षिक कराड येथील प्रीतीसंगम या ठिकाणी मंगळवार दिनांक २८ मे रोजी घेण्यात येणार आहे. यासाठी जय्यत तयारी सुरू करण्यात आलेली आहे. सातारा जिल्ह्यातील नदीकाठची गावे तसेच दरड प्रवर्ण गावे व नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी विविध प्रकारे उपाययोजना सुरू आहेत. त्याचबरोबर नगरपालिका टीम, युवक आपद मित्र, नोंदणीकृत सामाजिक संस्था व एन. डी. आर. एफ. यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहे. सातारा जिल्ह्यासाठी आठ बोटी, दीडशे लाइफ जॅकेट, दीडशे लाइफ बॉईज, रिंगा ,रोप वे 500 तसेच नदीकाठच्या गावांसाठी तरंगते प्लॉटिंग मल्टीस्ट्रेचर आधी साहित्य वितरित झाली आहेत.तालुकास्तरावर गाव पोलीस पाटील, ग्रामसेवक, शासकीय यंत्रणा यांना सूचनांचे तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आलेले आहे .

सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील व आपत्ती व्यवस्थापन समिती अधिकारी देविदास ताम्हाणे व शासकीय स्तरावरील गाव पातळीवरील कर्मचारी व अधिकारी हे सज्ज झालेले आहेत. नागरिकांनी दक्षता ठेवून आलेल्या संकटाला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाला सहकार्य करायचे आहे.

सातारा जिल्ह्यातील मिरगाव टोकावळे, आंबेकर, देवरुखवाडी आदी ठिकाणी दरड कोसळण्याचे प्रकार झाले होते .बचाव कार्य गतीने व्हावे यासाठी जुलै महिन्यात एन.डी. आर.एफ. ची टीम साताऱ्यात दाखल होणार आहे.२००५ साली भिलार गाव खचल्यामुळे तातडीने उपाययोजना करून त्यांचे योग्य पुनर्वसन केले होते. सध्या आपत्ती व्यवस्थापन समिती मार्फत पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील नदीकाठ व दरड कोसळणाऱ्या ठिकाणच्या नागरिकांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे. प्रीती संगम कराड या ठिकाणी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती व संत चोखामेळा पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे मंगळवार दिनांक २८ मे रोजी मॉक ड्रिल करण्यात येणार आहे.

## दरडी कोसळण्याच्या अनुषंगाने पूर्व संकेत ओळखणे व खबरदारीच्या उपाययोजना

सातारा जिल्हयातील डोंगराळ भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या मूसळधार पावसामूळे दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भूजलाचे निरिक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

1. आपल्या आसपासच्या विहिरी, विंधन विहिरी (बोअर) जर 3 तासांहून अधिक काळ ओसांडून वाहत असतील तर ही दरड कोसळण्याची चाहूल समजावी.
2. जर अचानक अनेक नवीन झऱ्यांचा उगम आपल्याला आढळत असेल, झऱ्याच्या प्रवाहामध्ये पाचपट अथवा अधिक वाढ झालेली दिसत असेल अथवा झऱ्याच्या पाण्याचे तापमान हे नैसर्गिक तापमानापेक्षा साधारण 5 अंश से. पेक्षा अधिक भासत असेल तर हि सुध्दा धोक्याची घंटा समजावी.
3. अतिवृष्टीमुळे झाडे, विदयुत पोल, तारांची कुंपणे, कलणे/तिरका होणे, इ. लक्षणे दिसू लागल्यास.
4. पक्षी व जनावरांच्या वर्तणूकीमध्ये अचानक बदल होणे (वेगळा आवाज काढणे / किंकाळणे,पायांनी जमिन उकरणे, पक्षी एकत्रित येणे इ.)
5. घरातून जमिनीतून पाण्याचे पाझर / उफळा फूटणे अथवा झरे निर्माण होणे. व घरातील फरशा उचकटणे.
6. जमिनीला नवीन ठिकाणी पाझर फुटणे.
7. नियमित येणाऱ्या झऱ्यातून अचानक गढूळ पाणी येऊ लागणे.
8. भात खचरांना भेगा पडणे.

वरील सर्व प्रकारची लक्षणे अतिवृष्टीच्या कालावधीत जाणवत असतील तर तेथील नागरिकांनी त्या ठिकाणापासून किमान 500 मीटर दूर सुरक्षित ठिकाणी स्वतःहून स्थलांतरित होणे अपेक्षित आहे. आणि अशा बाबीं निदर्शनास आलेस स्थानिक प्रशासनास (तलाठी, पोलीस पाटील,
कोतवाल, ग्रामसेवक इ.) यांचे निदर्शनास आणून दयाव्यात. अशी उपयुक्त सूचना जिल्हाधिकारी कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे त्याचा प्रसार व प्रचार स्थानिक पातळीवर सर्वांनी करावा असे सुचित करण्यात आले आहे.

## वाहतूक सुविधांमध्ये बळकटीची आवश्यकता



● नाशिक : सर्व अनुकूल स्थिती असूनही नाशिकचे अर्थकारण काही विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित राहिले. हवाई नकाशावर आलेल्या नाशिकची माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र असणाऱ्या देशातील प्रमुख शहरांशी अद्याप थेट जोडणी बाकी आहे. नाशिक-मुंबई महामार्गावर वाहनधारकांना कित्येक तास कोंडीत अडकून पडावे लागते. नाशिक-पुणे या औद्योगिक शहरांना जोडणाऱ्या द्रुतगती रेल्वचा विषय रखडला आहे. नाशिक शहरात जलद सार्वजनिक वाहतुकीसाठी मांडलेली, देशातील महानगरांपेक्षा वेगळ्या धाटणीची मेट्रो निओची संकल्पना अंतिम मंजुरीअभावी पुढे सरकली नाही. नाशिकच्या अर्थकारणावर कृषी, धार्मिक पर्यटन, उद्योग व्यवसायाचा प्रभाव आहे. वाराणसीतील गंगा आरतीच्या धर्तीवर गोदा आरतीला सुरुवात झाली. धार्मिक आणि वाइन पर्यटनाला बराच वाव असताना स्थानिक पातळीवर पायाभूत सुविधांचा अभाव, दळणवळण व्यवस्थेतील अडचणी प्रकर्षाने समोर येतात. नाशिक जिल्ह्याचे १,५३,१९८ कोटींवर असणारे उत्पन्न प्रशासनाने २०२७-२८ पर्यंत ३,९२,३५१ कोटी रुपयांवर नेण्याचे ध्येय निश्चित केले आहे. एअरबसच्या ताफ्यातील ए-३२० विमानांच्या देखभाल दुरुस्तीसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) देखभाल-दुरुस्ती केंद्र उभारत आहे. कांदा व द्राक्ष निर्यात ग्रामीण अर्थचक्रात महत्त्वाचे ठरतात. शहर, परिसरात वाहतुकीची साधने मर्यादित आहेत.

### दळणवळण व्यवस्था महत्त्वाची का?

जिल्ह्यात २२ हजार ८६० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. मुंबई-नाशिक या चारपदरी महामार्गावरील प्रवास भिवंडीतील वाहतूक कोंडीमुळे जिकिरीचा ठरतो. रखडलेल्या पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वे प्रकल्पात मार्ग बदलाचा विचार सुरू आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाशी नाशिक जोडले गेले आहे. प्रस्तावित सुरत-चेन्नई हरित महामार्गासाठी चार तालुक्यांत भूसंपादनाची तयारी सुरू आहे. नाशिक हे दिल्ली, हैदराबाद, नागपूर, इंदूर, गोवा, अहमदाबाद या शहरांशी थेट विमान सेवेने जोडले गेले आहे.

# मुंबई पुणे जुन्या महामार्गावर अपघात

## दोघांचा मृत्यू, सहा जण जखमी



● लोणावळा : मुंबई पुणे जुन्या महामार्गावर वाघजाई मंदिराच्या खालील बाजूला असलेल्या खंडाळा बॅटरी हिल येथील वळणावर सोमवारी रात्री साडेदहा वाजता मुंबईच्या दिशेने निघालेला कंटेनर उलटून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या मोटारीवर पडला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत.

या अपघातात दत्तात्रय रामदास चौधरी (वय ५५) व कविता दत्तात्रय चौधरी (वय ४६ वर्षे दोघेही रा. निमडाळे, जि. धुळे सध्या रा. देवकणपिंपरी, जि. जळगाव) यांचा मृत्यू झाला असून भूमिका दत्तात्रय चौधरी (वय १६ वर्षे), मितांश दत्तात्रय चौधरी (वय ९ वर्ष, दोघेही रा. निमडाळे, जि. धुळे सध्या रा. देवकणपिंपरी, जि. जळगाव), योगेश श्रीराम चौधरी (वय ४० वर्षे), जान्हवी योगेश चौधरी (वय ३१), दिपांशा योगेश चौधरी (वय ९) , जिगीशा योगेश चौधरी (वय दीड वर्षे चौघेही रा. संस्कृती बिल्डिंग राव कॉलनी तळेगाव, ता. मावळ) हे जखमी झाले आहेत.लोणावळा शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने निघालेल्या कंटेनर चालकाचा खंडाळा बॅटरी हिल येथील उतार आणि वळणार ताबा सुटला. कंटेनर पुण्याकडे निघालेल्या मोटारीवर उलटला पलटी झाला. अपघातात मोटार चालकासह एका महिलेचा मृत्यू झाला.

# मावळमध्ये निकालापूर्वीच महायुतीत वादाची ठिणगी

## खासदार श्रीरंग बारणेंचा अजितदादांच्या राष्ट्रवादीवर आरोप,



● पिंपरी : मावळ लोकसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही. ताकदीने काम केले नसल्याचा आरोप महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी केला. ज्यांनी काम केले नाही, त्यांची नावे पवार यांच्याकडे दिल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे निकालापूर्वीच मावळात महायुतीत वादाची ठिणगी पडली. महायुतीचे उमेदवार बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात चुरशीची लढत झाली आहे. त्यामुळे मावळच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाघेरे हे पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. जुन्या सहका-यांनी त्यांचे काम केल्याचे बोलले जात होते. त्यातच महायुतीचे उमेदवार बारणे यांनीच राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी काम केले नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी वाघेरे यांचे काम केले असल्याच्या दाव्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब झाले.

बारणे म्हणाले की, मावळमध्ये महायुतीची ताकद होती, आहे आणि राहील. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची मावळात कोठेही ताकद नाही. शेकापची उरण, पनवेलला ताकद आहे. महायुतीच्या सर्व आमदारांनी काम केले. अजित पवार यांनी मावळमधील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यांच्या आमदारांनी आणि पदाधिकाऱ्यांनी काम केले. पण, काही कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही. नेत्यांचे आदेश मानले नाहीत.

# BJP MP Brij Bhushan pleads not guilty in sexual harassment case: 'Koi sawaal hi nahi hai'

● New Delhi - BJP MP and former Wrestling Federation of India (WFI) chief Brij Bhushan Sharan Singh on Tuesday pleaded not guilty in the sexual harassment case registered against him by the Delhi Police on the complaint of women wrestlers.

"Koi sawaal hi nahi hai. Galati kiye hi nahi to maanenge kyun? (There is no question. When I did not make a mistake, why will I admit to it?" Singh said when Additional Chief Metropolitan Magistrate (ACMM) Priyanka Rajpoot asked him if he pleads guilty.

While ordering the framing of charges against Singh, ACMM Rajpoot noted that abuse of dominant position, continued perception of threat to victims, premeditated design and sexual exploitation of vulnerable female subordinates formed part of a "pattern" in respect to the charges against the BJP MP. "…(Bhushan's) continuing position in the WFI, coupled with the victims' perception of a continuing threat, shows the acts of accused no. 1 (Bhushan) was not isolated but part of a broader pattern of behaviour whereby he exploited his position of power over an extended period. These alleged acts, committed in Delhi and outside Delhi/India, were executed under a 'single criminal enterprise' or 'single impulse' to sexually exploit and harass female wrestlers by abusing his dominant position," the ACMM noted.

It was also observed by the court that there was a clear "unity of purpose" or "unity of thought" behind Singh's actions to "sexually exploit vulnerable female subordinates as much as possible".



"Even during wrestling events, they (the female wrestlers) used to avoid going out independently… Thus, it reflects their fear and persistent threat posed by the presence of the accused (Brij Bhushan)," the court observed while pointing out the hierarchy in the workforce between Singh, who was in power, and the female wrestlers who were his subordinates.

Whether or not the offences allegedly committed by Singh were "continuing" in nature was one of the main points to be decided by the court. It was advocate Rajiv Mohan's (representing Singh) case that the alleged offences were not continuous in nature and were in fact separate.

Noting that the alleged offences reflected a "systematic and recurring pattern", the magistrate noted that they collectively formed a continuing offence and were not isolated incidents. ACMM Rajpoot also noted that the nature of the sexual misconduct was "strikingly similar" and involved "exploiting professional settings or events".

Another contention raised by advocate Mohan was that some of the alleged offences took place outside India and are therefore outside the "territorial jurisdiction" of the Delhi court. He had also earlier argued that no sanction under Section 188 of the Criminal Procedure Code had been obtained from the central government. On the above grounds, he had sought Singh's discharge.

The court, however, noted that the alleged offences suggested a "pre-meditated design" and that a joint trial can be conducted even if some offences had occurred outside Delhi since the offences were part of the "same transaction". It was observed by the court that a sanction from the central government was not needed as the alleged offences were continuous in nature and several of them had occurred in Delhi.

A delay of several years in filing some complaints was also flagged by advocate Mohan. However, in this respect, the court observed, "… it cannot be denied that it takes significant courage and camaraderie to speak out against such a powerful person", adding that the accused could not be discharged on the grounds of delay alone.

The court had last Friday said there was sufficient material to frame charges against Singh under Sections 354 (assault or criminal force to woman with intent to outrage her modesty) and 354A (sexual harassment) of the Indian Penal Code (IPC). It said for all allegations levelled against Singh by victim number 6, he has been discharged. Her charges dated back to 2012. Singh has not been charged with the offence of stalking under Section 354D of the IPC.

In June last year, Delhi Police had filed a chargesheet against Bhushan for alleged sexual harassment, assault and stalking of six women wrestlers.

# Consumer panel asks bank to pay Rs 1L for deducting EMI for loan not availed



● Mumbai - A consumer commission here has directed IDFC Bank to pay Rs 1 lakh compensation to a man from Navi Mumbai after it deducted EMI for a loan he never availed.

Holding the bank guilty of deficiency in service, the District Consumer Disputes Redressal Commission (Mumbai Suburban) also asked it to refund the EMI amount of Rs 5,676 with interest to the customer.


The order passed by the commission last month was made available recently.

The complainant claimed that in February 2020, he found out that the bank had deducted EMI from his account at its Panvel branch for a loan he had not availed. On enquiry, the bank informed the complainant that an email was sent to him, citing that it was an ECS payment, and when he visited the bank branch, he was given a loan account. However, when he logged into the account, the complainant found an expired voucher from the e-commerce company Amazon.

# TISS seeks dismissal of Dalit PhD student's court plea against suspension over 'anti-national activities'

● Mumbai - Mumbai's Tata Institute of Social Science (TISS) on Tuesday sought the dismissal of a plea filed by Dalit PhD student Ramadas K S before the Bombay High Court challenging his suspension by the institute over "repetitive misconduct and anti-national activities".

The institute informed the court that the student had approached it without exercising an alternative remedy of appeal, before its vice-chancellor, which it said was available for him.




The institute's submission came when a vacation bench of Justices Arif S Doctor and Somasekhar Sundaresan was hearing Ramadas's plea for revocation of the April 18 order, which suspended him from its School of Developmental Studies.

## थोडक्यात

### अधीक्षक डाकघर रायगड विभाग, अलिबाग येथे दि.14 जून रोजी डाक अदालतीचे आयोजन

● रायगड, प्रतिनिधी :

अधीक्षक डाकघर रायगड विभाग, अलिबाग यांच्या कार्यालयाद्वारे दि.14 जून 2024 रोजी, सकाळी ठीक 11 वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली असून इछूक ग्राहकांनी आपली तक्रार 2 प्रतीत अधीक्षक डाकघर रायगड विभाग सुनिल थळकर यांच्याकडे दि.06 जून 2024 पर्यंत पोहचेल अशा रितीने पाठवावी, असे आवाहन अधीक्षक डाकघर रायगड विभाग सुनिल थळकर यांनी केले आहे.

रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/समस्या ज्याचे निवारण 6 आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे..

### कटफळ ग्रामपंचायतीवर आ.शहाजीबापू पाटील गटाचा झेंडा

● सांगोला, प्रतिनिधी :

सांगोला तालुक्यातील कटफळ ग्रामपंचायतीचे सरपंच विजय खरात यांनी राजीनामा दिल्यानंतर मंगळवारी सरपंचपदाची निवड झाली. या निवडणुकीत आमदार शहाजीबापू गटाच्या सुवर्णा परमेश्वर हाके यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर आमदार शहाजीबापू गटाच्या कार्यकर्त्यांसह समर्थकांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला.

कटफळ ता.सांगोला ग्रामपंचायतीचे सरपंच विजय खरात यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर मंगळवारी निवडणुक घेण्यात आली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून बुरूंगले यांनी काम पाहिले. सरपंच पदाच्या निवडणुकीत आमदार शहाजीबापू गटाकडून सुवर्णा परमेश्वर हाके यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. सरपंच पदासाठी सुवर्णा हाके यांचा एकमेव उमेदवारी अर्ज केल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कटफळ ग्रामपंचायतीवर आमदार शहाजीबापू पाटील गटाने झेंडा फडकवला आहे.

# विमानाच्या धडकेत ३६ फ्लेमिंगो ठार!

## मुंबईतील अनेक भागात आढळले मृत पक्षी

● मुंबई, प्रतिनिधी :

मुंबईच्या घाटकोपर येथे एमिरेट्सच्या एका फ्लाइट (Emirates flight) शी धडकल्याने कमीत कमी ३६ फ्लेमिंगो ठार झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे विमानाचे देखील नुकसान झाले आहे.

रेस्किंग असोसिएशन फॉर वाइल्डलाइफ वेलफेयर (आरएडब्लूडब्लू) चे संस्थापक आणि वन विभागाचे मानद वन्यजीव वार्डन पवन शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, घाटकोपरमध्ये अनेक ठिकणी मृत पक्षी आढळून आल्याचे फोन येत होते. तसेच पुढे बोलताना त्यांनी सांगितलं की पक्षांच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी या पक्ष्यांना




पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले आहे.

मुंबईकडे येत असलेल्या अमिरेट्स फ्लाइटची धडक लागल्याने ३६ फ्लेमिंगो मृत्यूमुखी पडले आहेत. ही घटना सोमवारी रात्री घडल्याचे सांगितले जात आहे. हा अपघात झाल्यानंतर फ्लेमिंगो घाटकोपरच्या वेगवेगळ्या भागात आढळून आले. तसेच या धडकेने विमानाचे देखील नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. असे असूनही विमानाची विमानतळावर सुरक्षीतपणे लँडिंग करण्यात आली. सध्या विमानातील सर्व प्रवाशी सुरक्षित असल्याचे सांगितले जाते आहे. वन अधिकारी आणि ॲनिमल ॲक्टिव्हीस्ट यांनी मेलेल्या फ्लेमिंगो पक्षांची विल्हेवाट लावली.

या अपघाताचे अनेक व्हिडीओ देखील समोर आले आहेत. सांगितले जात आहे की मृत फ्लेमिंगो मुंबईच्या अनेक वेगवेगळ्या भागातून सापडले आहेत. स्थानिक लोकांनी फोन करून याबद्दल माहिती दिली, त्यानंतर वन विभाग आणि इतरांना घटनास्थळी पोहचून फ्लेमिंगोना ताब्यात घेतले.

### माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना मंत्रालयात अभिवादन




● मुंबई, प्रतिनिधी :

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव रोशनी कदम पाटील यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

राजीव गांधी यांच्या स्मरणार्थ श्रीमती कदम पाटील यांनी मंत्रालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनाची शपथ दिली. यावेळी अवर सचिव राजेंद्र गायकवाड, कक्ष अधिकारी घनश्याम जाधव यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेत 3974 विद्यार्थी अनुत्तीर्ण!



● सोलापूर, प्रतिनिधी :

इयत्ता बारावीच्या परीक्षेत जिल्ह्यातील ३२ हजार १७५ मुलांपैकी २९ हजार २३७ तर २४ हजार ४२४ मुलींपैकी २३ हजार ३८८ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व शाखांमधील मुलांचा निकाल ९०.८६ टक्के तर मुलींचा निकाल ९५.७५ टक्के लागला असून जिल्ह्याच्या एकूण निकालाची टक्केवारी ९२.९७ टक्के आहे.

पुणे विभागात पुण्याचा निकाल ९३.२० टक्के लागला असून सोलापूरने यंदा नगरला (९२.३३ टक्के) मागे टाकत विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा बैठे पथकांसह भरारी पथकांची संख्या वाढविण्यात आली होती. त्यामुळे यंदा निकालाच्या एकूण टक्केवारीत घट झाल्याचे चित्र असून कला शाखेचा निकाल सर्वात कमी झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, मोहोळ व सांगोला या तीन तालुक्यांचाच निकाल ९५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

# जंजिरा किल्ला २६ मे पासून राहणार बंद

● मुरूड, प्रतिनिधी :

साडेतीनशे वर्षापूर्वी समुद्रात बांधलेला जंजिरा किल्ला कोकण किनारपट्टीवरील पाच जलदुर्गांपैकी एक असून वास्तूशिल्पाचा अजोड नमुना आहे.

पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव पावसाळ्यात किल्ल्यावरील प्रवासी वाहतूक बंद ठेवण्यात येते. यंदा २६ मेपासून ही वाहतूक बंद करण्यात आल्याची माहिती पुरातत्त्व विभागाच्या सहायक संवर्धकांकडून देण्यात आली.

पावसाळ्यात खोरा जेटी अथवा राजपुरी जेटीवरून बाहेरून



किल्ला पाहता येईल. मात्र समुद्रात जाण्यास बंदी असेल. पावसाळयात समुद्रात मोठ्या लाटा उसळत असल्याने पर्यटकांची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. त्यामुळे सरकारी स्तरावरून किल्ल्यावरील प्रवासी वाहतूक बंद केली जाते. २६ मेपासून जंजिऱ्याचे दरवाजे बंद करावेत, असे आदेश मेरिटाईम बोर्ड आणि पुरातत्त्व विभागाला देण्यात आले आहेत.

दरवर्षी सहा ते सात लाख पर्यटक ऐतिहासिक जंजिरा व अलीकडे पद्मदुर्ग किल्ल्यावर येतात. खोराबंदर व राजपुरी येथून प्रवासी वाहतूक करणाऱ्या स्थानिकांच्या १५ शिडाच्या होड्या व दोन इंजिन बोटी तैनात असून राजपुरीच्या १५० कुटुंबीयांची गुजराण या व्यवसायावर निर्भर आहे. फास्टफूड, शीतपेये, नारळपाणी आदींसह पर्यटनावर आधारित छोटे-मोठे व्यवसाय तीन महिने बंद राहत असल्याने स्थानिकांना पर्यायी रोजगार शोधावा लागतो.


# सहमतीने संबंध बलात्कार नाही

## उच्च न्यायालयाचे निरीक्षण; तरुणाला मिळाला दिलासा

● नागपूर, प्रतिनिधी :

तरुण व तरुणीमध्ये सहमतीने शारीरिक संबंध असल्यास त्याला बलात्कार म्हणता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणात नोंदविले.

या प्रकरणात तरुणाला दिलासा मिळाला असून लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याने त्याच्यावरील गुन्हा व दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. आरोपीने या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती.



या प्रकरणावर न्यायमूर्ती विनय जोशी आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या समक्ष सुनावणी झाली. आरोपी व पीडितेची फेसबुकवरून मैत्री झाली. पुढे या मैत्रीचे प्रेमात रुपांतरण झाले व कुटुंबीयांच्या संमतीने त्यांनी लग्नाचाही निर्णय घेतला.

मात्र, काही कारणास्तव लग्न मोडले. यावर तरुणीने त्याच्यावर बलात्काराचा आरोप लावला होता. तो न्यायालयाने चुकीचा ठरवित त्याच्याविरुद्धचा गुन्हा व दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच, बलात्कार आणि सहतीने शारीरिक संबंध ठेवणे यात बराच फरक असल्याचेही न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे.

अशा प्रकरणात खोटे बोलून किंवा फसवून शारीरिक संबंध प्रस्थापित झालेत का? हे तपासून पाहणे महत्त्वाचे ठरते. जर आरोपीचे उद्दिष्ट फक्त संबंध ठेवणे असेल आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून फसवले असेल तर तो बलात्कार समजला जाईल.

# खतांच्या किमतीत दरवाढ झाल्याची अफवा

● काटेवाडी, प्रतिनिधी :

रासायनिक खतांच्या किमती मागील वर्षीच्या तुलनेत पुन्हा एकदा वाढल्या अशा प्रकारच्या अफवा सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरवल्या जात आहेत. वृत्तवाहिन्यांचे लोगो वापरून या पद्धतीच्या इमेजेस सोशल मीडियात व्हायरल झाल्या आहेत. यामुळे सहाजिकच ग्रामीण भागामध्ये या अफवांचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, कृषी आयुक्तालयातील गुणनियंत्रण संचालक विकास पाटील यांनी कोणत्याही खतांच्या किमतीमध्ये दरवाढ झाली नसल्याचा निर्वाळा यापूर्वीच दिला आहे.



जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयाच्या वतीने १२ मे रोजी आगामी खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण व वाजवी दरात निविष्ठांचा पुरवठा करण्यासाठी जिल्हास्तरीय भरारी पथकाची स्थापना केली आहे. मात्र, मागील वर्षाच्या तुलनेत संयुक्त/मिश्र खतांच्या किमतीमध्ये काही प्रमाणात वाढ झाली आहे.

# अनधिकृत होर्डिंगवर वडगावात कारवाई सुरू



● घाटकोपर, प्रतिनिधी :

येथे होर्डिंग कोसळण्याच्या घडलेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून वडगाव नगरपंचायतीने शहरातील सर्व होर्डिंगची प्रत्यक्ष पाहणी करून अनधिकृत होर्डिंगमालकांना नोटीस दिल्या होत्या. सात दिवसांच्या आत नवीन स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल नगर पंचायत कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. अनधिकृत होर्डिंगधारकांनी विहित नमुन्यात परवानगी घ्यावी अन्यथा अनधिकृत होर्डिंग तत्काळ काढून घ्यावे, अशा सूचना केल्या होत्या. तसेच रस्ते विकास महामंडळाच्या हद्दीत असणाऱ्या होर्डिंगधारकांनी या कार्यालयाकडून परवानगी घेतली असल्यास त्यांची एक प्रत व स्ट्रक्चरल ऑडिट केल्याच्या अहवालाची एक प्रत नगरपंचायत कार्यालय जमा करावी. अन्यथा शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग नगरपंचायतीमार्फत काढून टाकण्यात येईल व येणारा खर्च होर्डिंगधारकांकडून वसूल करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना नगरपंचायत प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. प्रवीण निकम यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने सोमवारपासून अनधिकृत होर्डिंग काढण्यास सुरुवात करण्यात आली. डॉ. निकम यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायत सहाय्यक नगररचनाकार लक्ष्मण माने, कार्यालयीन अधीक्षक संदीप सोनवणे, साजिद विराणी, सहाय्यक अभियंता समाधान पवार, सोमनाथ आगळे, अशोक गायकवाड आदींसह इतर नगरपंचायत कर्मचारी यांच्या पथकाने ही कारवाई सुरू केली आहे.

# अवकाळीचा अठरा घरांना तडाखा

● अहमदनगर, प्रतिनिधी :

जिल्ह्यात रविवारी (ता.२०) अवकाळी पावसाचा सात तालुक्यांना तडाखा बसला. वादळी वाऱ्यामुळे १८ घरांचे नुकसान तर २६ हेक्टर क्षेत्रावरील फळबागांचे नुकसान झाले.

जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसाचा तडाखा बसत आहे. रविवारी सकाळपासून तापमानात वाढ जाणवत होती. सायंकाळनंतर वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटास प्रारंभ झाला.



जिल्ह्याच्या उत्तर आणि दक्षिण भागात अवकाळी पावसाला सुरूवात झाली. अकोले, राहाता तालुक्यातील अनेक गावांमधील झाडे उन्मळून पडले. वीज वाहक तारांवर झाडे पडल्याने अनेक गावातील वीज पुरवठा ठप्प झाला होता. राहाता तालुक्यातील दहा घरांचे नुकसान झाले. काही घरांच्या छताचे पत्रे उडाल्याने संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. कच्च्या घरांचेही नुकसान झाले आहे. शेवगाव तालुक्यात चार, नेवासे दोन, जामखेड तालुक्यात एका घराचे नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसामुळे उन्हाळी हंगामातील फळबागांचे नुकसान झाले आहे. आंबा, केळी, डाळिंब या फळबागांचे नुकसान जास्त आहे. श्रीगोंदे तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे.

# तांदळाचे दर क्विंटलमागे ५०० रुपयांनी वाढले; उन्हाळी साळीचा उतारा कमी झाल्याचा परिणाम

● नांदेड, प्रतिनिधी :

उन्हाळी साळीचा उतारा कमी आल्याने मागील आठवड्यापासून तांदळाच्या दरात क्विंटलामागे ५०० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यातच तूर, हरभरा दाळीचे दरही तेजीत असल्याने ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ बसणार आहे.

नांदेड जिल्ह्यात शेजारील तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक यासोबतच चंद्रपूर येथून तांदूळ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येतो. अल्पपावसाचा फटका इतर पिकांसोबतच साळीच्या पिकालाही बसला आहे. त्यामुळे नोव्हेंबर (२०२३) मध्ये तांदूळ दाखल होताच जुन्यासोबतच नव्याचेही दर वाढले होते. सुरुवातीपासूनच तांदळाचे दर तेजीत होते. खरीप हंगामातील तांदूळ चवीलाही उन्हाळी तांदळापेक्षा चांगला लागतो.



मागील आठवड्यापर्यंत शेजारील राज्यांमध्ये साळ काढण्यात आली असून, उतारा कमी झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या तांदळाच्या दरात क्विंटलामागे ५०० रुपयांनी दरवाढ झाली आहे. तर, बासमती तांदळात क्विंटलामागे एक हजार रुपयांनी दरवाढ झाली आहे. त्यातच दाळींच्याही किमती वाढल्या आहेत. तूरदाळ १६ हजार ते १८ हजार रुपये क्विंटल, हरभरा दाळ ७ हजार ५०० ते ८ हजार ५०० रुपये क्विंटल झाली आहे. याशिवाय गव्हामध्येही १०० ते १५० रुपये क्विंटलामागे दरवाढ झाली आहे. पुढील काही दिवस दर कमी होण्याची शक्यता कमी असल्याचे व्यापारी कमलाकर बेंडे यांनी सांगितले.

### असे आहेत दर (क्विंटलमध्ये)

- कोलम : पूर्वी सहा हजार रुपये : आता ६ हजार ५००
- एचएमटी : पूर्वी ५ हजार ५०० रुपये : आता ६ हजार
- डीपीटी : पूर्वी ४ हजार रुपये : आता ४ हजार ५००
- बासमती : पूर्वी ९ हजार रुपये : आता १० हजार रुपये

### बैलांना कानाला टॅग मारण्याची मुदत वाढवण्याची बळीराजा प्राणी व बैलगाडी शर्यत बचाव समितीची मागणी



● सातारा, प्रतिनिधी :

बैलगाडी शर्यती संबंधित राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने नवीन नियमावली लागू केलेली आहे. त्यामुळे आता सरसकट सर्वच बैलांच्या कानाला टॅग लावण्यात येणार आहे. परंतु बैलगाडी शर्यतीत सक्रिय सहभाग घेणाऱ्या बैलांना कानाला टॅग लावण्याची मुदत वाढवून द्यावी व काना ऐवजी गळ्याला टॅग लावावा अशी मागणी बळीराजा प्राणी व बैलगाडी शर्यत बचाव समितीचे बैलगाडी प्रेमी व हनुमंतराव चवरे -पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत माहिती अशी की, राज्य शासनाने महाराष्ट्रातील सरसकट प्राणी यांची जनगणना करण्यासाठी त्यांच्या कानाला टॅग लावण्याची भूमिका एक जून पासून सुरू करणार आहे.त्यामुळे आता शर्यतीतील बैलांना सुद्धा कानाला टॅग लावण्यात येणार आहे .या प्रकारामुळे शेतकरी व बैलगाडी शर्यत प्रेमींमध्ये संभ्रमावस्था झालेली होती .याबाबत आज सातारा निवासी उपजिल्हाधिकारी श्री नागेश पाटील यांची बळीराजा प्राणी व बैलगाडी शर्यत बचाव समितीचे हनुमंतराव चवरे -, श्रीमंत जगदाळे, प्रताप झाजुर्णे, हनुमंत निकम, राजेंद्र गिरी, राहुल कापले, अक्षय घोरपडे, आकाश शिंदे, महेश मोरे, श्रीमंत निकम ,सागर फाळके, श्याम अष्टेकर, दीपक देवकर, विपुल कदम, विनोद मोरे, विकास भोसले, बाळू जाधव व शेतकरी आणि बळीराजा प्राणी व बैलगाडी शर्यत बचाव समितीच्या सर्वांनी भेट घेऊन निवेदन दिलेले आहे . सदर बैलगाडी मालकांना बैलगाडी शर्यत सहभाग घेता यावा व अल्प कालावधीनंतर हेअर टॅग बाबतचा नेम थोडा शिथिल करून बैलगाडी शर्यतीतील बैलांच्या गळ्यामध्ये टॅग लावावा .अशी सूचना यानिमित्त करण्यात आली .याबाबत व्यापक धोरण ठरवण्यासाठी बळीराजा प्राणी व बैलगाडी शर्यत बचाव समितीच्या वतीने दिनांक १२ जून रोजी दुपारी कोरेगाव या ठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती हनुमंत निकम व हनुमंतराव चवरे पाटील यांनी दिली आहे.